

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण




स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक


# समाचार


Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine **December 2024** - Pages - 60

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे    कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७६ * अंक २ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-




शनिवार दि. १६ नोव्हेंबर २०२४ रोजी संस्थेचे ज्येष्ठ माजी विद्यार्थी
श्री. रमेशचंद्र गोविंद कुलकर्णी यांनी संस्थेस रु. ३ लाखांची देणगी दिली.
श्री. रमेशचंद्र गोविंद कुलकर्णी यांच्या हस्ते त्यांच्या कल्याण, मुंबई येथील निवासस्थानी
देणगीचा धनादेश स्वीकारताना डावीकडून कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संचालक श्री. सुनिल रेडेकर,
कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊




कोलकत्त्यात होणाऱ्या राष्ट्रीय बास्केटबॉल चॅम्पियनशिपमध्ये महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणारा आणि राष्ट्रीय स्तरावर खेळणारा घाटकोपर शाखेतला पहिला बास्केटबॉल खेळाडू कु. रिझवान सिद्धीक मुल्ला, इ. १० वी




दि. २४ नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, पालघर येथे झालेल्या जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मुंबई उपनगर यांनी आयोजित केलेल्या विभागस्तरीय शालेय कराटे स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणारा विद्यार्थी कु. अरहंत अनुर पवार, इ. १० वी ड



जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई उपनगर आयोजित शालेय जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणारी विद्यार्थिनी कु. सारा संदीप येवले



सहशालेय उपक्रमांतर्गत लोकनृत्य स्पर्धेत मोठ्या गटात प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थिनींसमवेत मार्गदर्शक शिक्षिका



सहशालेय उपक्रमांतर्गत लोकनृत्य स्पर्धेत छोट्या गटात तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांसमवेत मार्गदर्शक शिक्षिका

संपादकीय

# सरते वर्ष

डिसेंबर महिना हा साधारणतः आपल्याकडल्या मार्गशीर्ष महिन्याला समांतर असतो. डिसेंबरच्या आगेमागे किंवा डिसेंबर महिन्यातच 'मासांना मार्गशीर्षः' डोकावत असतो. बारा महिन्यातल्या मार्गशीर्ष मासालाच भगवान श्रीकृष्णाने सर्वोत्तम मासाचे स्थान दिले आहे.

साधारणतः पावसाळ्यात पेरलेले धान्य डिसेंबरपर्यंत हाती येते. वातावरणात विशेष उष्मा नसतो. एकंदर निसर्गाच्या आल्हाददायी रूपाचा अनुभव या महिन्यात आपल्याला जाणवत असतो. डिसेंबर महिन्यातच दिवस हळूहळू मोठा व्हायला सुरूवात होते. 'तमसो मा ज्योतिर्गमय' अज्ञानाच्या अंधःकारातून ज्ञानाच्या उजेडाकडे वाटचाल करण्याचे ब्रीद असलेल्या आपल्या संस्कृतीला त्यामुळेच कदाचित मार्गशीर्ष अधिक भावत असावा. अंधःकाराचा नाश करणाऱ्या, कधीही वेडेवाकडे न जाणाऱ्या उबदार सूर्यकिरणांनी आपले जीवन अधिक काळ उजळविण्यास या महिन्यापासूनच प्रारंभ होत असल्याने मार्गशीर्षाचे महत्त्व अधिक मानले जात असावे.

इंग्रजी कालगणनेनुसार डिसेंबर म्हणजे वर्षाअखेरचा महिना. त्यामुळेच डिसेंबर महिन्यात शिशिर ऋतू नसला तरी मला,

'शिशिरऋतूच्या पुनरागमे एकेक पान गळावया,
का लागता येतसे मज नकळत रडावया'

या कविवर्य मर्ढेकरांच्या ओळी आठवतात आणि मन थोडसं विषण्ण होतं. डिसेंबर महिना आला की, जाणीव होते की, आणखी एक वर्ष संपले. डिसेंबर महिना उजाडला की, 'कालो जगत् भक्षकः' काळ हा जगावर अधिराज्य गाजवणारा असतो. तो आपल्या गतीने झपाट्याने पसारच होत असतो. 'No man is rich enough to by back his past' याची जाणीव डिसेंबर महिन्यात प्रकर्षाने होते. जीवन किती झपाट्याने सरत असते, याची चाहूल डिसेंबर महिना करून देत असतो. त्यामुळे संपूर्ण वर्षाचा लेखाजोखा जेव्हा मी मांडण्याचा प्रयत्न करतो तेव्हा जाणवते की, वाऱ्याच्या वेगाने

'घटका जाती, पळे जाती', हेच खरे

पण हे जीवनचक्रच आहे. उत्पत्ती - स्थिती - लय हा जीवनचक्राचाच एक अविभाज्य भाग आहे. किंबहुना लयभाव आहे, म्हणूनच वर्तमानाची गोडी असते. ती गोडी वाढविण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. जाणाऱ्या वर्षाचे सिंहावलोकन करत असताना 'गेले द्यायचे राहून', ही खंत जाणवत असली तरी,

'रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल या' जाणीवेने मनावरची खिन्नतेची अभ्रे दूर होतात. 'मरणात खरोखर जग जगते' याची जाणीव होते आणि पुन्हा एकवार नव्या जोमाने जीवनस्वप्ने प्रत्यक्षात आणण्याची धडपड सुरू होते. आत्तापर्यंतच्या जीवनप्रवाहात जे काही आपण कमावले किंवा गमावले त्याची जाणीव डिसेंबर महिना आपल्याला करून देत असतो. त्याचबरोबर जे काही साध्य करावयाचे आहे त्यासाठी नव्या उमेदीने प्रयत्न करण्याची प्रेरणाही त्यायोगे आपल्याला मिळते.

जीवनात सत्त्वाचा उदयोस्तु करत, जे गमावले त्याबद्दल खंत न करता आगामी वर्षातले संकल्प दृढ करून त्यावरून वाटचाल करण्याचा संदेश डिसेंबर महिना देतो. त्यामुळेच,

*I remember, I remember*
*The Fir trees dark and high*
*I used to think their slender tops*
*Were close against the sky*
*It was a childish ignorance*
*But now this little joy*
*To know I'm farther off from heaven*
*Then when I was a boy*

गतस्मृतींनी मन हळूवार करणारा, अंतातच दडलेल्या आरंभाची जाणीव करून देणारा, सरत्या वर्षाचा निरोप आणि आगामी वर्षाची चाहूल देणारा हा डिसेंबर महिना त्यामुळेच मला मनापासून आवडतो.

दि. २६ नोव्हेंबर २०२४
उत्पत्ती एकादशी - आळंदी यात्रा



## लोकशाहीतील स्वातंत्र्य

आपल्या देशात लोकशाही राज्य-पद्धतीचा स्वीकार आपण केला; परंतु लोकशाही समाज-व्यवस्थेची मूलभूत तत्त्वे अद्याप समाजात रुजलेली नाहीत. इंग्लंडमध्ये कित्येक वर्षे लोकशाहीचा विकास होत आलेला आहे. ती सर्व प्रगती आत्मसात करायला आपल्याला काही काळ लागेल. बुद्धिपुर:स्सर व प्रसंगा-प्रसंगाने लोकशाहीची प्रधान तत्त्वे लोकांना शिकवायला पाहिजेत.

विचार स्वातंत्र्य, भाषण-स्वातंत्र्य, मत-स्वातंत्र्य, वैयक्तिक-स्वातंत्र्य आणि प्रचार स्वातंत्र्य यांच्यावर लोकराज्याची इमारत आधारलेली आहे. पुष्कळ लोक हे स्वातंत्र्य स्वत:पुरते मान्य करतात; पण इतरांना ते द्यायला तयार नसतात. म्हणजे लोकशाहीच्या नावाखाली ते हुकूमशाहीचा पुरस्कार करीत असतात. अडाणी लोकांना - यांच्यांत सुशिक्षित आणि अशिक्षित दोघेही येतात - हा फरक आकलन होत नाही.

स्वत: स्वातंत्र्य मागणाराने तेच स्वातंत्र्य इतरांनाही द्यायला पाहिजे. इतरांचे मत-स्वातंत्र्य, भाषण-स्वातंत्र्य, प्रचार-स्वातंत्र्यही मान्य केले पाहिजे. दोन किंवा अधिक मतप्रवाह, अनेक पक्ष, अनेक ध्येयवाद-हा लोकशाहीचा पाया आहे. विरोधी पक्षाची जोपासना लोकराज्यात केली जाते. विरोधी पक्षाच्या प्रमुखाला राज्यमंत्र्यासारखा पगारही असतो.

एका प्रसिद्ध इंग्रज विचारवंताचे एक वाक्य मार्मिक आहे. तो विरोधकाला उद्देशून म्हणतो-''तुझ्या विधानातील एक अक्षरही मला मान्य नाही. तरी पण ते विधान करण्याचा तुझा हक्क आहे. आणि त्या तुझ्या हक्काच्या रक्षणाकरता मी प्राण जाईपर्यंत लढेन.'' किती उदात्त कल्पना आहे ही मत-स्वातंत्र्याची! या देशातल्या किती पुढाऱ्यांना, किती अनुयायांना यातले मर्म आकलन झाले आहे!

विरोधी विचारांच्या पक्षांना, व्यक्तींना, मतांना, वृत्तपत्रांना, प्रचाराला हिरिरीने नेस्तनाबूत करू इच्छिणाऱ्या पुढाऱ्यांना आणि अनुयायांना सतत विचारावेसे वाटते की, तुम्हाला लोकराज्याची मूलभूत तत्त्वे कळली आहेत का? मान्य आहेत का?

**डॉ. ग. श्री. खैर (नोव्हेंबर १९५७)**

## शिशुनिकेतन मराठी माध्यम, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. अरुणा कांबळे**

### शारदीय नवरात्रीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

दि. ५ ते ११ ऑक्टोबर २०२४ या कालावधीमध्ये शारदीय नवरात्रीनिमित्त इ. १ ली ते इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांसाठी पाटीपूजन, कन्यापूजन, भोंडला अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या विविध कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या सौ. अरूणा कांबळे या होत्या. हत्तीच्या मूर्तीची पूजा करून भोंडल्याच्या कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. या प्रसंगी उपशिक्षिका सौ. मोरे यांचे मार्गदर्शनाखाली पारंपरिक भोंडला गीते म्हटली. विद्यार्थ्यांनी गरबा, दांडिया यांचा मनमुराद आनंद लुटला.

दि. ११ ऑक्टोबर २०२४ रोजी पाटीपूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी पाटीवर सरस्वती रेखाटून फुले, हळदी कुंकू वाहून पूजा केली. सरस्वती मातेचे वंदन देवीला करूया हे गीत गाऊन प्रार्थना करण्यात आली.

कन्या हे देवीचे रूप मानले जात असल्याने हिंदू परंपरेनुसार कन्या पूजनाला महत्त्व आहे. वर्ग शिक्षिकांनी कन्यापूजन करून विद्यार्थिनींना भेटवस्तू दिल्या.

***

## महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**
**प्र. प्राचार्य : प्रा. पी. व्हि. शिंदे**

### औद्योगिक प्रशिक्षण

प्र. प्राचार्य श्री. पी. व्हि. शिंदेंनी केंद्रीय पेट्रो रसायन एवं प्रौद्योगिकी संस्था (सिपेट) संभाजीनगर व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांनी दि. ७ ते ११ ऑक्टोबर २०२४ या कालावधीमध्ये आयोजित केलेल्या 'ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग टेक्निक्स युजिंग एफ डी एम प्रिंटर' या विषयावरील एक आठवड्याचे औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण केले.

### शैक्षणिक औद्योगिक भेट

दि. १६ व १७ ऑक्टोबर २०२४ रोजी डिप्लोमा इन प्रिंटिंग टेक्नॉलॉजीच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी शासकीय फोटो झिंको मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे येथे भेट दिली. विद्यार्थ्यांनी शासकीय मुद्रणालयातील कामकाज कसे चालते हे जाणून घेतले. प्राध्यापिका कु. जान्हवी प्रभुणे व श्री. एस. के. बंडगर यांनी सदर भेटीचे संयोजन केले होते.

### रक्तदान शिबिर

दि. १७ ऑक्टोबर २०२४ रोजी 'आर. डी. घोलप मेमोरियल ब्लड बँक' यांच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक अशा सुमारे ४२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

***

## अभिनंदनीय !

रायगड जिल्हा परिषदेतर्फे देण्यात येणारे आदर्श शिक्षक पुरस्कार नुकतेच जाहीर झाले. दि. ५ सप्टेंबर २०२३ चा **'आदर्श शिक्षक पुरस्कार'** जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील हाशिवरे हितवर्धक मंडळाचे महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथील संस्कृत अध्यापक आणि संस्थेचे माजी विद्यार्थी श्री. ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी यांना जाहीर झाला आहे. संस्कृत अध्यापक श्री. ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी यांचे इयत्ता ७वी ते १०वी पर्यंतचे शिक्षण संस्थेचे महाराष्ट्र विद्यालय, पुणे येथे झाले आहे.

**संस्थेच्यावतीने संस्कृत अध्यापक श्री. ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी यांचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.**

***

## ❊ महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे ३० ❊



दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी
इंडक्शन प्रोग्रॅम प्रसंगी
माजी विद्यार्थी श्री. पवन खके
यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना
प्र. प्राचार्य पी. व्हि. शिंदे,
समवेत प्रा. अक्षय रावेतकर



दि. २५ सप्टेंबर २०२४
'प्रथम टेक्नॉलॉजी प्रायव्हेट
लिमिटेड', नसरापूर, पुणे
येथे औद्योगिक भेट प्रसंगी
प्र. प्राचार्य पी. व्हि. शिंदे,
प्राध्यापक आणि
अंतिम वर्षातील विद्यार्थी




रक्तदानाचे महत्त्व
सांगताना
'आर. डी. घोलप मेमोरियल
ब्लड बँक' चे चेअरमन
समवेत संचालक
डॉ. राजेंद्र कांबळे,
प्र. प्राचार्य पी. व्ही. शिंदे,
प्राध्यापक आणि
शिक्षकेतर कर्मचारी



रक्तदान करताना
विद्यार्थी
समवेत प्राध्यापक,
शिक्षकेतर
कर्मचारी
आणि
व्हॉलेंटियर्स

# मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**
**मुख्याध्यापिका : सौ. शिल्पा चितारे**
**मुख्याध्यापिका : सौ. मधुमती कदम**

## कोजागिरी पौर्णिमा उत्साहात साजरी

दि. १९ ऑक्टोबर २०२४ शनिवार रोजी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान शाळेच्या ज्येष्ठ लेखनिक माधुरी भालेराव यांनी भूषविले. त्यांनी पालकांना कोजगिरीचे अध्यात्मिक आणि आयुर्वेदिक महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. स्वरूपा मोरे यांनी केले. मुख्याध्यापिका सौ. मधुमती कदम यांनी उपस्थित पालकांशी संवाद साधला. पालकांसाठी गरबा नृत्य, संगीत खुर्ची स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. पालक व शिक्षकांनी विविध गुण दर्शनाचे कार्यक्रम सादर केले. पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सर्व कार्यक्रमात सहभाग घेतला. सौ. नीता गरग यांनी उपस्थितांचे आभार मानले. मसाला दूध आणि खाऊ देऊन मुलांचा आनंद द्विगुणित करण्यात आला.

## नवरात्रीनिमित्त भोंडल्याचे आयोजन

नवरात्रीनिमित्त विद्यार्थिनींसाठी भोंडल्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेच्या ज्येष्ठ लेखनिक माधुरी भालेराव यांच्या शुभ हस्ते शिक्षिका सौ. प्राजक्ता मुरमट्टी आणि सौ. चंद्रकला शिंदे यांना विशेष प्राविण्यासाठी तसेच इतर सर्व शिक्षकांना भेटवस्तू देऊन नवदुर्गा म्हणून सन्मानित करण्यात आले. मुख्याध्यापिकांनी भोंडल्याची महिती सांगितली. सर्व विद्यार्थिनींसाठी गरबा, दांडियाचे आयोजन केले होते. विद्यार्थिनींनी  पारंपरिक भोंडल्याची गाणी गायली. सर्व विद्यार्थ्यांना खिरापत वाटून कार्यक्रमाची सांगता झाली.

## NEP प्रशिक्षणात सहभाग

रोटरी क्लब ऑफ पुणे यांच्या तर्फे, ज्ञानदा प्रतिष्ठान कर्वेनगर, येथे शनिवार दि. ९ नोव्हेंबर २०२४ रोजी एनईपी चे वर्कशॉप आयोजित करण्यात आले होते. या वर्कशॉपमध्ये मुख्याध्यापिका सौ. मधुमती कदम, पर्यवेक्षिका सौ. स्वरूपा मोरे सहाय्यक शिक्षिका सौ. प्राजक्ता मुरमट्टी, सौ. शुभांगी भालगिरे सहभागी झाल्या होत्या. सदर वर्कशॉप मध्ये सूज्ञ अनुभवी मार्गदर्शकांनी उपस्थित शिक्षकांना उत्तम मार्गदर्शन केले. नवीन शैक्षणिक धोरण स्पष्टपणे समजावून सांगताना माननीय श्री संतोष परदेशी यांनी ५+३+३+४ हा पॅटर्न समजावून सांगितला. याशिवाय विद्यार्थी केंद्रित शिक्षणाची पुढील काळातील गरज विस्तृतपणे नमूद केली. सौ. सुमेधा गोखले यांनी शिक्षकांचे मानसिक आरोग्य चांगले कसे राहिले पाहिजे याकडे शिक्षकांनी लक्ष देणे ही काळाची गरज आहे, याविषयी चर्चा केली. मानसिक आरोग्य जपण्यासाठी व्यायाम प्राणायाम आणि नवनवीन गोष्टींचा ध्यास शिक्षकांनी घेतला पाहिजे, याविषयी उत्तम मार्गदर्शन केले. श्री बलवीर चावला यांनी आपण कमावलेल्या पैशांचा योग्य विनियोग कसा केला पाहिजे, कोणकोणत्या ठिकाणी आपण पैसे गुंतवले पाहिजेत, याविषयी आपल्या कुटुंवियांना माहिती असणे किती गरजेचे आहे आणि योग्य आर्थिक विनिमय अशा महत्त्वपूर्ण गोष्टींचा ऊहापोह केला सदर वर्कशॉप मध्ये सहभागी असलेल्या सर्व शिक्षकांना रोटरी क्लब पुणे यांच्यातर्फे प्रमाणपत्र देण्यात आले.

***

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**प्राचार्या : सौ. सुप्रिया देशकुलकर्णी**
**मुख्याध्यापिका : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

### वेशभूषा स्पर्धा

सोमवार दि. २३ सप्टेंबर २०२४ रोजी वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयानुसार वेशभूषा केली होती. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शाळेच्या माजी शिक्षिका सौ. सुजाता गायकवाड यांनी परीक्षकाचे काम पाहिले.

### महिना अखेर उपक्रम

सोमवार दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी महिना अखेर उपक्रमांतर्गत सर्व विद्यार्थ्यांनी रंगीत कपडे परिधान केले होते. शिशु गटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीमध्ये पिंपळपानाचे ठसे घेतले. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी छत्रीच्या चित्रामध्ये रंगीत कागदाचे कोलाज केले. विद्यार्थ्यांसाठी विविध खेळांचे आयोजन केले होते.

### चित्रकला स्पर्धा

सोमवार दि. ७ ऑक्टोबर २०२४ रोजी छोट्या गटातील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना दिलेले चित्र त्यांनी सुंदर रितीने रंगविले. या स्पर्धेचे परिक्षण सौ. मधुरा महाडीक व सौ. केतकी राजभोज यांनी केले.

### भोंडला

बुधवार दि. ९ ऑक्टोबर २०२४ रोजी नवरात्रीनिमित्त भोंडल्याचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांनी सुंदर रांगोळी काढून मधोमध हत्ती मांडून बाजूने फुलांच्या माळांची सजावट केली होती. सर्व विद्यार्थी रंगबेरंगी पोशाख परिधान करून आले होते. ऐलमा पैलमाच्या तालावर सर्व विद्यार्थ्यांनी फेर धरला. गरबा, दांडियाच्या गाण्यांच्या ठेक्यावर विद्यार्थ्यांनी ताल धरला. सर्व विद्यार्थ्यांना चुरमुरे - फरसाणचा खाऊ देण्यात आला.

दुपारच्या सत्रातील मोठ्या गटाच्या भोंडल्यात मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली आणि पर्यवेक्षिका सौ. स्वाती महाजन सहभागी झाल्या होत्या.

### दसरा

शुक्रवार दि. ११ ऑक्टोबर २०२४ रोजी दसऱ्याच्या निमित्ताने शिशु गटातील विद्यार्थ्यांनी आपट्याच्या पानाचे चित्र रंगविले. छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी ठशाच्या मदतीने पेन्सिलने पानाचे चित्र काढून ते रंगविले व झेंडूच्या फुलाच्या ठशाच्या सहाय्याने ते सजविले. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी वहीत शिक्षकांनी काढून दिलेल्या १ अंकांच्या सरस्वतीमध्ये छान रंग भरले तसेच आपट्याचे पान काढून त्यामध्ये रंग भरले आणि देवीचे व दांडिया खेळणाऱ्या मुला - मुलीचे चित्र रंगविले.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दसऱ्याचे महत्त्व सांगणाऱ्या रामायण व महाभारतातील गोष्टी सांगितल्या.

### प्रथम सत्र परीक्षा

गुरूवार दि. १७ ते २५ ऑक्टोबर २०२४ या दरम्यान प्रथम सत्र परीक्षा घेण्यात आली.

### वार्षिक स्नेहभोजन

शनिवार दि. २६ ऑक्टोबर २०२४ रोजी वार्षिक स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व विद्यार्थी रंगीबेरंगी कपडे परिधान करून आले होते. विद्यार्थ्यांनी सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला.

## प्राथमिक विभाग

### नवीन उपक्रम

शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ पासून अनेक नवीन उपक्रम सुरू करण्यात आले. शालेय अभ्यासक्रमात संगीत व नृत्य या विषयांचा समावेश करण्यात आला.

तसेच खेळांमध्ये इ. १ ली ते इ. ६ वी साठी तायक्वांदो, आर्चरी (तिरंदाजी) व इ. १ ली व २ री साठी मल्लखांब या खेळांचा समावेश करण्यात आला.

मल्लखांब या खेळातील विद्यार्थ्यांनी दि. ११ व १२ सप्टेंबर २०२४ रोजी गणेशोत्सवाच्या काळात पुणे जिल्हा मल्लखांब संघटना व महाराष्ट्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र मंडळाच्या प्रांगणात आयोजित स्पर्धेत १० वर्ष वयोगटाखालील ५ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. त्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

इ. १ ली ते इ. ६ वी च्या विद्यार्थ्यांना रोबोटिक्स, कोडिंग व आर्टिफिशियल इन्टेलिजन्स या तंत्रज्ञानाची लहानपणापासूनच ओळख व्हावी या हेतूने प्रथमच प्रत्येक महिन्याच्या दर रविवारी वरील विषयांचे प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणामध्ये १६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**अभिनंदनीय**

शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या बाल शिक्षण मंदिर शाळेतर्फे आंतरशालेय कथाकथन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण २३ शाळांमधून १२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. आपल्या शाळेमधून एकूण १० विद्यार्थी सहभागी झाले होते. यापैकी कु. अनुश्री संजय केदारी इ. ४ थी ब हिला प्रथम आणि कु. श्रिया मोती चव्हाण इ. ४ थी अ हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

सोमवार दि. २३ सप्टेंबर २०२४ रोजी इ. १ ली ते इ. ४ थी व दि. २६ सप्टेंबर २०२४ रोजी इ. ५ वी व ६ वी च्या विद्यार्थ्यांसाठी लायन्स क्लब ऑफ पुणे फोर्ट तर्फे ४६ व्या आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन उद्यान प्रसाद कार्यालय, सदाशिव पेठ येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत कु. इशिता विजय इंगोले इ. ५ वी या विद्यार्थिनीस उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ पासून प्रत्येक महिन्याच्या दर रविवारी इ. ५ वी व इ. ६ वी साठी वेदिक गणिताचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत.

शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेची प्रथम फेरी आणि अंतिम फेरी मंगळवार दि. २४ सप्टेंबर २०२४ रोजी झाली. या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | इ / तु | क्रमांक |
|---|---|---|
| कु. वीरा र. खरात | १ ली क | प्रथम |
| कु. शौर्य स. शेटे | १ ली इ | द्वितीय |
| कु. स्वरा स. मोरे | १ ली क | तृतीय |
| कु. ध्रुव न. पाठक | २ री ड | प्रथम |
| कु. मालविका अ. कुलकर्णी | २ री अ | द्वितीय |
| कु. रित्विज प. लोहार | २ री क | तृतीय |
| कु. अर्निका प. काटकर | ३ री क | प्रथम |
| कु. आराध्या र. मांडे | ३ री क | द्वितीय |
| कु. मल्हार स. जायभाये | ३ री ब | तृतीय |
| कु. अक्षत स. कदम | ४ थी ब | प्रथम |
| कु. समिक्षा ल. सुरवसे | ४ थी इ | द्वितीय |
| कु. सौमित्र प. कुलकर्णी | ४ थी क | तृतीय |
| कु. श्रावक र. परड | ५ वी ड | प्रथम |
| कु. मुक्ता अ. कुलकर्णी | ५ वी क | द्वितीय |
| कु. अर्णव स. घोलप | ५ वी ब | तृतीय |
| कु. देवांशी प. वाघ | ६ वी इ | प्रथम |
| कु. आभा अ. आठवले | ६ वी अ | द्वितीय |
| कु. अनया ग. माने | ६ वी क | तृतीय |

**उपचारात्मक शिक्षण**

दि. १५ सप्टेंबर २०२४ पासून दर रविवारी इ. १ ली ते इ. ४ थी साठी उपचारात्मक शिक्षण (रिमेडियल क्लासेस) सुरू करण्यात आले.

**गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंती**

मंगळवार दि. १ ऑक्टोबर २०२४ शिक्षिका सौ. स्नेहल गायकवाड यांनी दि. २ ऑक्टोबर २०२४ रोजी साजऱ्या होणाऱ्या गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंती निमित्त महत्मा गांधीजी व लालबहादूर शास्त्रींची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी इ. २ री तील १० कब आणि १० बुलबुल विद्यार्थ्यांनी पुणे शहर भारत

स्काऊट आणि गाईड स्थानिक संस्था आयोजित कब आणि बुलबुल मेळाव्यात सहभाग घेतला.

**विजयादशमी दसरा**

शुक्रवार दि. ११ ऑक्टोबर २०२४ रोजी विजयादशमी या सणाची माहिती शिक्षिका सौ. प्रतिज्ञा मराठे यांनी विद्यार्थ्यांना दिली. तसेच सौ. स्नेहल गायकवाड यांनी कै. रतन टाटा यांच्या सामाजिक व औद्योगिक कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. कै. रतन टाटा यांना श्रध्दांजली अर्पण केली.

महावाचन चळवळी अंतर्गत इ. ३ री ते इ. ६ वी च्या विद्यार्थ्यांच्या वाचनाच्या चित्रफिती व छायाचित्रे घेण्यात आले. यास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

नवरात्रीनिमित्त संगीत शिक्षिका सौ. सुचेता परांजपे यांनी विद्यार्थ्यांसाठी देवी स्तोत्र गायले तसेच विद्यार्थ्यांची संगीतातील रूची वाढवण्यासाठी दररोज मधल्या सुट्टीनंतर संस्कारक्षम गाणे म्हणवून घेण्यात आले.

शुक्रवार दि. ११ आक्टोबर २०२४ रोजी इ. २ री च्या कब आणि बुलबुल च्या विद्यार्थ्यांनी दिवाळी उपक्रमांतर्गत पणत्या रंगविल्या व शतायू भवनातील वृध्दांना या पणत्या दिवाळी भेट म्हणून दिल्या.

**पालकांसाठी मोफत वाचनालय सुविधा उपलब्ध**

दि. १५ ऑक्टोबर हा दिवस डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्त दि. १९ ऑक्टोबर २०२४ पासून एक नवीन उपक्रम सुरू करण्यात आला. सर्व पालकांसाठी आपल्या शाळेचे ३४ हजार पुस्तकांचे सुसज्ज ग्रंथालय दर महिन्याच्या प्रत्येक शनिवारी दुपारी ४ ते ५ या वेळात मोफत वाचनासाठी खुले करण्यात आले आहे.

**प्रथम सत्रांत परीक्षा**

गुरुवार दि. १७ ते २५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत प्रथम सत्रांत परीक्षा घेण्यात आली.

**पालक सभा**

शनिवार दि. १९ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रथम सत्रातील दुसरी पालक प्रतिनिधी व माता पालक सभा घेण्यात आली.

**वार्षिक स्नेह भोजन**

शनिवार दि. २६ ऑक्टोबर २०२४ रोजी वार्षिक स्नेहभोजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. शिक्षिकांनी केलेल्या सजावटीने व रेखीव रांगोळीने कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## माध्यमिक विभाग

**डब्ल्यू डब्ल्यू एफ इंडिया प्रश्नमंजुषा स्पर्धा**

लहान मुलांमध्ये नैसर्गिक जग आणि जैवविविधतेचे महत्त्व जाणून घेण्यासाठी डब्ल्यू डब्ल्यू एफ इंडिया प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत कु. ध्रुव गोरेगावकर, इ. ८ वी इ आणि कु. युग्म गोरेगावरकर इ. ८ वी ड हे सहभागी झाले होते. दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी मुंबई येथे झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील १८० शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

**व्याख्यानाचे आयोजन**

दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी रोटरी क्लब, कात्रज शाखा यांच्यातर्फे इ. ९ वी च्या इंटरॅक्ट क्लबच्या विद्यार्थ्यांसाठी सिंहगड इन्स्टिट्यूट व्यवस्थापन आणि संगणक विभागाचे प्रभारी संचालक डॉ. विजय पुराणिक यांचे लिडरशीप या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

**एन. सी. सी. दिवस साजरा**

दि. ७ आणि ८ ऑक्टोबर २०२४ रोजी एन. सी. सी. दिवस साजरा करण्यात आला. दि. ७ ऑक्टोबर २०२४ रोजी आर्मी आणि एअर विंगच्या कॅडेटसनी ड्रिल फॉर्मेशन, स्त्री - सुरक्षा, वाहतूक जागरूकता, अग्निशमन तसेच शस्त्र हाताळणी या सर्वांचे उत्कृष्टपणे सादरकीकरण केले. तसेच विमानांची वेगवेगळी मॉडेल्स, मिसाईल्स, रायफल इ. शस्त्रे प्रदर्शनात मांडण्यात आली.

कारगिल युद्ध, स्त्री सुरक्षा, वाहतूक नियम या विषयांवर विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेली साधनेही प्रदर्शनात मांडण्यात आली होती. याचबरोबर थरारक अडथळे प्रशिक्षण, अग्निशामक प्रात्यक्षिक आणि रायफल पोझिशन डिस्प्लेसह प्रदर्शनाची सांगता झाली.

दि. ८ ऑक्टोबर २०२४ रोजी औपचारिक मेळावा पार पडला. यामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून सुभेदार, मेजर भाऊसाहेब तांडले, सुभेदार करमजित सिंग, हवालदार नाईक, आसाराम कांडे व कॉर्पोरेल के. के. प्रसाद हे सर्व हवाई दलातील अधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांना दि. ७ ऑक्टोबर २०२४ रोजी सादर केलेली प्रात्यक्षिके व प्रदर्शनात दाखविण्यात आलेली मॉडेल्स, मिसाईल्स, रायफल्स दाखविण्यात आल्या. प्रमुख पाहुण्यांनी, विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रयत्नांचे व समर्पणाचे कौतुक केले. या सर्व कॅडेट्सना शिक्षिका आर्मीविंग फर्स्ट ऑफिसर, सौ. अनिता गायगोळे आणि एअर विंग थर्ड ऑफिसर सौ. श्रुती कांबळे यांनी मार्गदर्शन केले.

**प्रथम सत्र परीक्षा**

दि. १४ ते २४ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत प्रथम सत्रांत परीक्षा घेण्यात आली.

**पालक सभा**

दि. १९ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रथम सत्रातील माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक विभागाची एकत्रित शिक्षक - पालक प्रतिनिधी आणि शिक्षक - माता पालक प्रतिनिधी सभा घेण्यात आली.

**वार्षिक स्नेहभोजन**

दि. २५ ऑक्टोबर रोजी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागातील इ. ७ वी इ. १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सर्व विद्यार्थ्यांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. याप्रसंगी सर्व विभागाच्या निवृत्त शिक्षक आणि शिक्षकेतर सेवकांनाही स्नेहभोजनासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

**अभिनंदनीय**

दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक विभागाच्या प्रभारी प्राचार्या म्हणून कार्यभार स्वीकारला. सौ. सुप्रिया देशकुलकर्णी या माध्यमिक विभागात ३३ वर्षांहून अधिक काळ कार्यरत आहेत आणि २०१९ पासून पर्यवेक्षिका म्हणून कार्यरत आहेत.

दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी माध्यमिक विभागातील शिक्षिका सौ. विजया काळे यांनी पर्यवेक्षिका म्हणून कार्यभार स्वीकारला.

**विविध क्रीडा स्पर्धांमधे विद्यार्थ्यांचे यश**

दि. १ ऑक्टोबर २०२४ रोजी जिम्नॅस्टिक्स ट्रस्ट फेडरेशनने बालेवाडी, पुणे येथे आयोजित केलेल्या आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक या प्रकारात कु. आराध्या भुजबळ इ. ८ वी अ हिने कांस्यपदक मिळविले.

दि. ६ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये कु. संग्राम गायकवाड इ. ८ वी क याला रौप्यपदक मिळाले.

दि. ८ ऑक्टोबर २०२४ रोजी बाबुराव सणस स्पोर्ट्स ग्राऊंड, पुणे येथे जिल्हा परिषदेतर्फे १७ वर्षाखालील गटासाठी ४ X १०० मीटर रीले स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत शाळेला सुवर्णपदक मिळाले. या विद्यार्थिनींची पुढील स्पर्धेसाठी निवड झाली. या स्पर्धेतील सहभागी विद्यार्थिनी पुढील प्रमाणे

| विद्यार्थिनीचे नाव | इ / तु |
|---|---|
| कु. मनाली गोतारणे | ९ वी ड |
| कु. सिया पुजारी | १० वी क |
| कु. आर्या चोरमले | ९ वी ब |
| कु. भूमी देशपांडे | ९ वी अ |
| कु. सई झरगड | ८ वी ब |

दि. ६ ऑक्टोबर २०२४ रोजी धायरी, पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये कु. नील कोंढरे इ. ७ वी क याने सुवर्णपदक मिळविले.

दि. ८ ऑक्टोबर २०२४ रोजी बाबुराव सणस ग्राऊंड, पुणे येथे झालेल्या आणि जिल्हा परिषदेतर्फे आयोजित १७ वर्षाखालील गटात १०० मी धावणे या स्पर्धेत कु. मनाली गोतारणे इ. ९ वी ड हिने रौप्यपदक मिळविले तिची पुढील स्पर्धेसाठी निवड झाली. याच गटात १०० मी धावणे या स्पर्धेत कु. भूमी देशपांडे इ. ९ वी अ हिने कांस्यपदक मिळविले.

पुणे जिल्हा परिषदेतर्फे आयोजित १४ वर्षांखालील गटात कु. अनन्या कुलकर्णी इ. ८ वी अ हिने थाळीफेक या क्रीडाप्रकारात सुवर्णपदक मिळविले. तसेच गोळाफेक या क्रीडाप्रकारात पाचवे स्थान मिळविले.

## उच्च माध्यमिक विभाग

### वक्तृत्व स्पर्धा

दि. १ ऑक्टोबर २०२४ रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत १० विद्यार्थी सहभागी झाले होते. माध्यमिक विभागातील सौ. दीपाली केळकर यांना परीक्षक म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना रोज काहीतरी चांगले वाचण्याविषयी सुचविले. या स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक | इ / तु |
|---|---|---|
| कु. आर्या केदार आठल्ये | प्रथम | ११ वी ड |
| कु. श्रावणी संतोष शर्मा | द्वितीय | १२ वी क |
| कु. तनिष्का संजय गौरव | तृतीय | ११ वी ड |

### समुपदेशनपर व्याख्यान

दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी शाळेच्या समुपदेशिका सौ. सावनी ओक यांचे इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांकरिता समुपदेशनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यामध्ये व्यवसाय निवड, वेळेचे नियोजन आपला दृष्टीकोन, आपले ध्येय कसे ठरवावे यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

### निबंध स्पर्धा

दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

| विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक | इ / तु |
|---|---|---|
| कु. तनिष्का संजय पाटील | प्रथम | ११ वी ब |
| कु. आर्या केदार आठल्ये | द्वितीय | ११ वी ड |
| कु. वेदांत युवराज खेडकर | तृतीय | १२ वी ब |

### अतिथी व्याख्यान

दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यात्या सौ. वनिता म्हस्के, पुणे विद्यार्थी गृह विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पुणे ९ यांचे व्यवसाय निवडीसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. संगणकीय विज्ञानाच्या क्षेत्रात असणाऱ्या संधींविषयी त्यांनी माहिती दिली.

### पोस्टर मेकिंग स्पर्धा

दि. २४ सप्टेंबर २०२४ रोजी पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी विद्यार्थी विद्यार्थिनींचे गट करण्यात आले होते. प्रत्येक गटात दोन स्पर्धक होते. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सौ. कस्तुरी आपटे व सौ. अंजली जोशी यांची नियुक्ती करण्यात आली होती. या स्पर्धेत पारितोषिक प्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | इ / तु | क्रमांक |
|---|---|---|
| कु. हर्ष पटवर्धन | १२ वी ब | प्रथम |
| कु. अभिषेक पाटील | १२ वी अ | प्रथम |
| कु. प्रांजल राजवाडे | १२ वी अ | द्वितीय |
| कु. अनुष्का रासकर | १२ वी क | द्वितीय |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन !**

***

## ✻ मुक्तांगण इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ ✻





लायन्स क्लब ऑफ पुणे फोर्ट आयोजित ४६ व्या आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत पाहुण्यांच्या हस्ते उत्तेजनार्थ पारितोषिक स्वीकारणारी कु. इशिता विजय इंगोले इ. ५ वी ब

↑ बालशिक्षण मंदिर शाळेतर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारणाऱ्या
कु. अनुश्री संजय केदारी इ. ४ थी ब
कु. श्रिया मोती चव्हाण इ. ४ थी अ









→ शतायू भवनातील आजी आजोबांना आणि सेवकांना स्वतः रंगवलेल्या पणत्या भेट देऊन दीपावलीच्या शुभेच्छा देताना इ. २ री तील कब आणि बुलबुल विद्यार्थी



पर्यवेक्षिका सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या प्रभारी प्राचार्या पदाचा कार्यभार स्वीकारल्याबद्दल अभिनंदन करताना कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, समवेत उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, श्री. सुनिल रेडेकर व श्री. आनंद कुलकर्णी

## विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

## विद्याभवन नं. २ माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. सुनिल भालचंद्र पाटील**

### कु. रिझवान सिद्धीक मुल्ला याची महाराष्ट्र राज्य युवा राष्ट्रीय बास्केटबॉल संघात निवड

विद्याभवन हायस्कूल नं २, घाटकोपर येथील विद्यार्थी कु. रिझवान सिद्धीक मुल्ला, इ. १० वी याची महाराष्ट्र राज्य संघात निवड झाली आहे. बास्केटबॉल फेडरेशन ऑफ इंडियाद्वारे दि. ४ ते ७ नोव्हेंबर २०२४ दरम्यान इंडियन जिमखाना प्रा. लि., माटुंगा, मुंबई येथे आयोजित केलेल्या निवड चाचणीमध्ये त्याची निवड झाली.

कु. रिझवान सिद्धीक मुल्ला दि. २९ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२४ दरम्यान कोलकत्यात होणाऱ्या राष्ट्रीय बास्केटबॉल चॅम्पियनशिपमध्ये महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. त्याचा बास्केटबॉलचा प्रवास इ. ३ री  पासून सुरू झाला असून सातत्यपूर्ण प्रयत्न व समर्पणाच्या जोरावर तो या महत्त्वपूर्ण टप्प्यावर पोहोचला.

कौतुकास्पद बाब म्हणजे कु. रिझवान आपल्या शाळेतील राष्ट्रीय-स्तरावरील पहिला बास्केटबॉल खेळाडू आहे.

कु. रिझवान मुल्ला याच्या यशाबद्दल त्याचे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बाऱ्हाडे तसेच सर्व पदाधिकारी, शिक्षक यांनी अभिनंदन केले. आगामी राष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये सुयश मिळवण्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

### जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेतील सुयश

जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई उपनगर आयोजित शालेय जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धा बुधवार दि. २३ ऑक्टोबर २०२४ रोजी एम. जी क्रॉस रोड महानगरपालिका शाळा, कांदिवली (प.) येथे पार पडली. सदर स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल नं. २ ची विद्यार्थिनी कु. सारा संदीप येवले हिने सुवर्णपदक पटाकाविले.

विजेत्या व उपविजेत्या संघाचे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे तसेच सर्व पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

### विभागीय शालेय कराटे स्पर्धेतील सुयश

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मुंबई उपनगर यांच्या वतीने आयोजित विभागस्तरीय शालेय कराटे स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल, पालघर येथे दि. २४ नोव्हेंबर २०२४ रोजी पार पडली. सदर स्पर्धेत विद्याभवन नं. २ चा विद्यार्थी कु. अरहंत अनुर पवार, इ. १०वी ड याने सुवर्णपदक पटकावले. कु. अरहंत याचे विद्याभवन संकुलातर्फे हार्दिक अभिनंदन व राज्यस्तरीय स्पर्धेसाठी खूप खूप शुभेच्छा!

***

### * नम्र विनंती *

**देणगीदार व हितचिंतक यांनी संस्थेच्या बँक खात्यावर ऑनलाईन देणगी रक्कम पाठविल्यानंतर कृपया संस्थेच्या ई-मेल आयडीवर किंवा संस्थेच्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून, देणगी देणाऱ्याचे पूर्ण नाव, पत्ता व देणगी देण्याचे निमित्त आणि विनियोग इ. माहिती कळवावी. तसेच पॅन कार्डची प्रत पाठवावी. बँकेत देणगी रक्कम जमा झाल्यावर फक्त रक्कम समजते. बाकी सविस्तर माहिती कळत नाही.**

**ई-मेल : pvgheadoffice@gmail.com**

**दूरध्वनी क्रमांक : ०२०-२४४७०९२७ / २४४७०५७३**

**मोबाईल क्रमांक : ९६९९८७६२०३**

**राजेंद्र बोऱ्हाडे**
**कार्याध्यक्ष**

# आवाहन

## पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ
## मुंबई विभाग हीरक महोत्सवी वर्ष सांगता समारंभ

हीरक महोत्सवी वर्ष सांगता समारंभाचे आयोजन रविवार दिनांक १९/०१/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता करण्यात आले आहे.

त्यानिमित्ताने माजी विद्यार्थ्यांचे दोन दिवसांचे स्नेहसंमेलन योजिले आहे.

हा कार्यक्रम शनिवार दिनांक. १८/०१/२०२५, सकाळी १०.०० वाजता विद्याभवन, घाटकोपर शाखा येथे आयोजण्यात आला आहे. आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे. कार्यक्रमाची सांगता रविवारी सायंकाळी ५.०० वाजता होईल.

उपस्थितांची भोजन व निवास व्यवस्था मुंबई शाखेत करण्यात आली आहे.

अधिक माहितीसाठी सचिव - श्री. टी. आर. दौंडकर दू. भा. ९८१९४४४२०८, किंवा खजिनदार - श्री. प्रकाश सादमे दू. भा. ९८१९०३१२३५ यांच्याशी संपर्क साधावा.

**अध्यक्ष / सचिव**
**पु. वि. गृ. मा. वि. मंडळ, मुंबई**

**✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ✻**



स्वच्छता पंधरवड्यानिमित्त आयोजित प्रभात फेरीमध्ये सहभागी झालेल्या उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, शिक्षक आणि विद्यार्थी



स्वच्छता पंधरवडयाच्या निमित्ताने शाळेचा परिसर स्वच्छ करताना शिक्षक व विद्यार्थी

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊



लायन्स क्लब ऑफ घाटकोपर तर्फे
सत्कार करण्यात आलेले मान्यवर
श्रीमती योगिनी पोतदार, मुख्याध्यापिका,
श्री. सुनिल पाटील, मुख्याध्यापक,
श्रीमती ज्योती देसाई, उपमुख्याध्यापिका,
श्रीमती तनुजा पांडे, सहा. शिक्षिका,
श्री. विनोद बिरादर, सहा. शिक्षक आणि
श्रीमती नंदिनी सुरी, सहा. शिक्षिका







जिल्हास्तरीय १४ वर्षांखालील कुस्ती स्पर्धेत
रजत पदक मिळविणारा विद्यार्थी
कु. साईराज दिलीप येळवे इ. ७वी

जिल्हास्तरीय आर्चरी स्पर्धेत रजत पदक मिळवणारा विद्यार्थी
कु. यतिन म्हात्रे इ. ९वी विद्याभवन हायस्कूल नं. २

## ※ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ※



हिंदी दिवस साजरा करताना विद्याभवन हायस्कूल नं.२ चे इ. ७वी व ८वी चे विद्यार्थी, मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील व शिक्षक



भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती व वाचन प्रेरणा दिनानिमित्त पुस्तकांचे वाचन करताना प्रशालेतील विद्यार्थी



आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत सँडविच बनवणारे इ. ५वी व ६वी चे विद्यार्थी



गुरूवर्य कुलगुरू दादासाहेब केतकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती सांगताना माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष श्री. बा. गो. कुलकर्णी (मा. वि.)

# नेरूळ शाखा, नवी मुंबई

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

#### विविध कलागुण स्पर्धा

सांस्कृतिक कलादर्पण, ठाणे आयोजित आंतरशालेय चौफेर कलागुण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये खालील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले.

#### शिक्षक सन्मान सोहळा

दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी संदीप नाईक प्रतिष्ठानतर्फे तेरणा डेंटल कॉलेज, नेरुळ येथे आयोजित 'शिक्षक सन्मान सोहळा २०२४' मध्ये मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक, शिक्षिका श्रीमती अमृता झोडपे, श्रीमती फरहाना चौगुले व शिक्षक श्री. संकेत थळे यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

#### गणेशमूर्ती बनवणे उपक्रम

दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी गणेश चतुर्थी निमित्त विद्यार्थ्यांसाठी शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती बनवणे व मखर बनवणे हे उपक्रम घेण्यात आले. या उपक्रमात कला शिक्षिका श्रीमती अमृता झोडपे यांनी विद्यार्थ्यांना मातीपासून गणेशमूर्ती कशी बनवावी हे शिकविले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी मूर्तीची पाहणी करत असताना विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनीषा मुळीक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीत हा उपक्रम शाळेच्या सभागृहामध्ये घेण्यात आला. या गणेशमूर्तींना रंगरंगोटी करण्यात आली. रंगमंचावर मखरामध्ये या गणेशमूर्ती ठेवून पूजा करून आरती करण्यात आली. श्रीमती प्रतिभा कुमकर यांनी श्रीगणेशाचा जन्म कसा झाला याची आख्यायिका विद्यार्थ्यांना सांगितली. विद्यार्थ्यांनी गणपती बाप्पांना वंदन केले.

#### शिक्षक दिन

दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास लायन्स क्लब, नवी मुंबईचे पदाधिकारी श्री. संजीव सूर्यवंशी (जिल्हा प्रशासक, लायन्स क्लब) श्री. प्रवीण सरनाईक (चार्टर्ड प्रेसिडंट) डॉ. प्रताप मुदलियार, कीर्ती सूर्यवंशी, नमिता मिश्रा, डॉ. रीना अग्रवाल आणि त्यांचे सहकारी तसेच कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, सर्व विभागांचे मुख्याध्यापक, समन्वयक, पर्यवेक्षक आणि शिक्षकवृंद उपस्थित होते. दीप प्रज्वलन व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. यानंतर सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्राथमिक मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी सामूहिक योगासने सादर केली. शिक्षकांनी आपले ज्ञान नेहमी वाढवत रहावे व स्वत:ला अपग्रेड करत रहावे. या शाळेची २४ वर्षांची शैक्षणिक प्रगती उल्लेखनीय आहे. यामध्ये मुख्याध्यापक, शिक्षकांसह प्रत्येक घटकाचे मोठे योगदान आहे. या शब्दात श्री. संजीव सूर्यवंशी यांनी शाळेचे व शिक्षकांचे कौतुक केले. शिक्षक हे केवळ ज्ञानाचे भांडार नाहीत तर ते आपल्या जीवनाचे शिल्पकार असतात. शिक्षक आपल्या भविष्याला आर्थिकदृष्ट्या, भावनिक दृष्ट्या व नैतिक दृष्ट्या आकार देतात. विद्यार्थ्यांच्या वाढीसाठी आपले जीवन समर्पित करतात, असे श्री. प्रवीण सरनाईक यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी जेव्हा डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले, त्यावेळी डॉ. राधाकृष्णन यांनी इच्छा व्यक्त केली की, माझा वाढदिवस असा साजरा करा की, त्या दिवशी शिक्षकांचा सन्मान करण्यात येईल म्हणून आपण डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा वाढदिवस हा शिक्षक दिन म्हणून साजरा करतो. 'आचार्य देवो भव' असे आपण म्हणतो. ज्याप्रमाणे देव आपल्याला आशीर्वाद देतो, त्याचप्रमाणे शिक्षक हे ज्ञान देण्याचे काम करतात. आचार्य म्हणजे शिक्षक, गुरू आणि ते

देवासमान असतात असे कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. लायन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या शाळेतील शिक्षकांचा सन्मान केला त्याबद्दल श्री. दिनेश मिसाळ यांनी सर्वांचे आभार मानले व सर्वांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सर्व मुख्याध्यापक व शिक्षकवृंदाला लायन्स क्लब तर्फे शिक्षकरत्न प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा देखील सन्मान करण्यात आला. सर्व उपस्थितांना लायन्स क्लब तर्फे अल्पोपहार देण्यात आला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनीही सर्व शिक्षकांना श्रीफळ देऊन सन्मानित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका श्रीमती प्रिया तिय्यर यांनी केले.

**शिक्षकांसाठी विविध स्पर्धा**

दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी रोटरी क्लब गुरू सन्मान आयडियल टिचर ॲवॉर्ड, नवी मुंबई यांच्यातर्फे शिक्षकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शिक्षिका श्रीमती प्रतिभा प्रविण कुमकर यांनी एकपात्री अभिनय या स्पर्धेत द्वितीय क्रमांक संपादित केला. ट्रॉफी, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले. तसेच शिक्षिका श्रीमती अमृता झोडपे यांना चित्रकला स्पर्धेत व श्रीमती फरहाना चौगुले यांना नृत्य स्पर्धेत सहभागी झाल्याबद्दल ॲक्सिस बँकेतर्फे सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. संस्थेच्या वतीने सर्वांचे हार्दिक अभिनंदन!

**रास दांडिया**

दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेला रास दांडियाचा कार्यक्रम मोठ्या जल्लोषात संपन्न झाला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनीषा मुळीक, मुख्याध्यापिका श्री. गोरख कदम, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. या दिवशी इ. १ली च्या विद्यार्थिनींनी देवींच्या नऊ विविध अवतारांच्या वेशभूषा केल्या होत्या. देवींना विविध नावांनी ओळखले जाते व त्याप्रमाणे त्यांची रूपे देखील आहेत. आपल्या घरामध्ये आपली आई सुद्धा एक देवीचेच रूप आहे. आपण तिला देवीप्रमाणे मानसन्मान दिला पाहिजे. तसेच महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठे कोणती आहेत. अशी प्रश्नोत्तरे विचारत कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व नवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या. यानंतर पारंपरिक वेशभूषेत आलेल्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी दांडियाच्या विविध गाण्यांवर गरबा खेळत मनसोक्त आनंद घेतला.

# विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

### इनरव्हील क्लब तर्फे विद्याभवन प्राथमिक विभागास लॅपटॉप सप्रेम भेट

इनरव्हील क्लब ऑफ न्यू बॉम्बे, सीसाईड या सेवाभावी संस्थेद्वारे दि. १५ सप्टेंबर २०२४ रोजी प्रशालेत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या संस्थेतर्फे सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात नेहमीच विविध पर्यावरणपूरक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमास इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा श्रीमती दमन यादव, पूनम भार्गव, निर्मला बिश्नोई, मीना माथूर, शम्मी ढिल्लो, शोभा इ. सहकारी उपस्थित होत्या. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते पुस्तक भेट देऊन अतिथींचे स्वागत व सत्कार करण्यात आला. आधुनिक तंत्रज्ञानाची गरज ओळखून इनरव्हील क्लबच्या वतीने विद्याभवन प्राथमिक मराठी विभागास एक लॅपटॉप सप्रेम भेट देण्यात आला. श्रीमती शोभा यांनी शाळेच्या प्रगतीचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून उंच गगनभरारी घ्यावी असे मत व्यक्त केले. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांनी शाळेच्या गुणवत्तेचे व विद्यार्थ्यांचे कौतुक करत विद्यार्थी शालेय प्रगतीची जबाबदारी घेण्यास सक्षम आहेत असे मत व्यक्त केले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी

विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेतील आधुनिक डिजिटल साहित्याचा योग्य वापर करून आपल्या ज्ञानाच्या कक्षा अधिकाधिक वृद्धिंगत कराव्यात असे सांगून इनरव्हील क्लबचे मन:पूर्वक आभार मानले.

### सेवा सहयोग संस्थेतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप

सेवा सहयोग या सेवाभावी संस्थेतर्फे दि. २३ सप्टेंबर रोजी विद्याभवन संकुलातील गरजू व होतकरु विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सहयोग ही संस्था समाजातील वंचित घटकांसाठी त्यांच्या विकासासाठी अविरतपणे कार्य करत आहे. याप्रसंगी सेवा सहयोग संस्थेच्या श्रीमती रेश्मा पट्टम व श्रीमती ऋतिका शेलार या उपस्थित होत्या. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनीषा मुळीक, श्रीमती श्रीजा नायर, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, विद्यार्थी व शिक्षकवर्ग यावेळी उपस्थित होते. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांच्या हस्ते मान्यवरांना श्रीफळ व पुस्तक भेट देऊन स्वागत करण्यात आले. श्रीमती रेश्मा पट्टम यांनी सेवा सहयोग या संस्थेच्या कार्याविषयी माहिती सांगितली व शिक्षण सक्षमीकरणासाठी शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या शाळेत आलो आहोत, विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून यशस्वी व्हावे असा संदेश दिला. त्यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

### अग्निशमन प्रशिक्षण

दि. १६ सप्टेंबर २०२४ रोजी विद्याभवन संकुलात श्रीजी टेक्नॉलॉजी यांच्यातर्फे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी अग्निशमन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. श्री. विशाल लवटे यांच्या टीमने अग्निशमन प्रशिक्षण प्रात्यक्षिकासह सादर केले. आग लागल्यावर कोणती काळजी घ्यावी, कोणत्या गोष्टी टाळाव्यात याविषयी मार्गदर्शन केले. शाळेत उपलब्ध असलेल्या अग्निशमन साहित्याची योग्य हाताळणी करण्याविषयी मार्गदर्शन केले. शिक्षकांना प्रात्यक्षिक दाखवून त्यांच्याकडून प्रात्यक्षिक करून घेतले. या प्रशिक्षणातून आग लागल्यास घाबरुन न जाता सावधानपणे, काळजीपूर्वक आग विझवण्याचे ज्ञान उपस्थितांना मिळाले. विद्यार्थी मंत्रिमंडळाने देखील हे प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणासाठी संस्थेचे कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनीषा मुळीक व सर्व शिक्षकवर्ग उपस्थित होता.

### स्वच्छता पंधरवडा

दि. १८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा' या अभियानांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत स्वच्छता शपथ, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, चित्रकला, रांगोळी स्पर्धा इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेविषयी जागरुकता निर्माण करणारे पथनाट्य सादर केले. इ. १ली ते ७वीच्या विद्यार्थ्यांनी बनविलेल्या टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले. दि. २७ सप्टेंबर रोजी भरविण्यात आलेल्या या प्रदर्शनास श्रीमती संघरत्ना खिल्लारे, उपायुक्त (शिक्षण), नवी मुंबई महानगरपालिका यांनी भेट दिली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कला कौशल्याचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी प्लॅस्टिकच्या बाटल्यांपासून फुलदाणी, बाहुली, पायपुसणी, फुले, खेळणी, तोरण इ. शोभिवंत वस्तू बनवल्या. या प्रदर्शनातील सर्व वस्तू विद्यार्थी व पालकांनी बनविल्या होत्या. श्रीमती संघरत्ना खिल्लारे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी केलेल्या कलाकौशल्याचे कौतुक केले. चांगल्या सवयी, चांगले संस्कार अंगी बाळगा. हात धुण्याचे तंत्र शिकून घ्या. स्वच्छता ही सेवा प्रत्येकाने देशासाठी करायची आहे असे म्हणून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी संस्थेचे कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

## सॅवलॉन कंपनी तर्फे हात धुवा कार्यक्रमाचे आयोजन

स्वच्छ भारत, स्वस्थ भारत अंतर्गत सॅवलॉन कंपनी तर्फे दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी विद्यार्थ्यांना हात कसे धुवावे, याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. इ. ४थी ते इ. ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सॅवलॉन कंपनीचे श्री. ऋतेश पाटील, साहिल अहिरवार, श्री. निर्भय भोईर इ. मान्यवर उपस्थित होते. चित्रफितीद्वारे त्यांनी विद्यार्थ्यांना हात धुण्याच्या पद्धती समजावून सांगितल्या. प्रत्येक विद्यार्थ्याला हात धुण्याचे महत्त्व पटवून दिले. प्रत्येकाला सॅवलॉन हॅन्डवॉशचे मोफत वाटप करण्यात आले.

## उडान कार्यक्रमांतर्गत शिक्षकांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन (शिक्षक सुयश)

दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी इनरव्हील क्लब ऑफ न्यू बॉम्बे सीसाईड, नवी मुंबई यांच्या वतीने वाशी येथील स्पोर्टस् ॲकॅडमी येथे शिक्षकांसाठी 'शिक्षक सन्मान उडान' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा प्रेरणा रायचूर व इतर पदाधिकारी उपस्थित होते. रायगड, पालघर, नवी मुंबईतील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात शिक्षणक्षेत्रात विशेष, उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्य केले म्हणून श्रीमती नूतन संजय गवांदे व श्रीमती कविता विनय तेंडुलकर यांना भेटवस्तू, प्रमाणपत्र व गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच समर्पण आणि प्रतिबद्धता म्हणून श्रीमती मेघाराणी दिनेश जोशी यांना भेटवस्तू, प्रमाणपत्र व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर शिक्षकांसाठी पाककला व वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत पुढील शिक्षकांनी सुयश प्राप्त केले.

| स्पर्धा | शिक्षकाचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| फायरलेस | श्रीमती नूतन संजय गवांदे | प्रथम |
| पाककला | श्रीमती कविता विनय तेंडुलकर | प्रथम |
| वेशभूषा | श्रीमती मेघाराणी दिनेश जोशी | तृतीय |

यशस्वी शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन!

## महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी

दि. १ ऑक्टोबर २०२४ रोजी विद्याभवन शालेय सभागृहात राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांच्या हस्ते महात्मा गांधीजी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. विद्यार्थी व शिक्षकांनी स्वच्छता ही सेवा याविषयी शपथ घेतली. इ. ७वी तील कु. अनुष्का गोळे हिने आपल्या भाषणातून स्वच्छतेचे महत्त्व विशद केले. श्रीमती नूतन गवांदे यांनी महात्मा गांधीजी व लालबहादूर शास्त्री यांच्या कार्याविषयी थोडक्यात माहिती सांगितली. इ. १ली व २रीच्या विद्यार्थ्यांची वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. इ. ३री ते ७ वीच्या विद्यार्थ्यांनी हातात झाडू व स्वच्छतेचे सामान घेऊन आपला वर्ग स्वच्छ केला.

## वाशी येथील सिडको भवनात विद्यार्थ्यांनी बनविलेल्या टाकाऊ पासून टिकाऊ वस्तूंचे प्रदर्शन

दि. २ ऑक्टोबर २०२४ रोजी 'स्वच्छता ही सेवा' अभियानाचा सांगता समारंभ वाशी सिडको भवनात मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा झाला. या कार्यक्रमात विद्याभवन संकुलातील विद्यार्थ्यांनी बनविलेल्या टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले. नवी मुंबईतील फक्त दोनच शाळांची निवड यासाठी करण्यात आली होती. त्यात विद्याभवन संकुलाची निवड ही अभिमानाची व आनंदाची गोष्ट. विद्यार्थ्यांनी विविध कला कौशल्य वापरुन सुंदर व आकर्षक वस्तू या प्रदर्शनात सादर केल्या. या प्रदर्शनास नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी भेट दिली. विद्यार्थ्यांनी बनविलेल्या वस्तूंचे भरभरुन कौतुक केले. शिक्षणाधिकारी श्रीमती अरुणा यादव तसेच अनेक मान्यवरांनी शिक्षक व विद्यार्थ्यांच्या कलेचे व कल्पकतेचे कौतुक केले. विद्यार्थी व शिक्षकांना अल्पोपहार देण्यात आला.

### शिक्षकांसाठी आयोजित स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून निवड

नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांसाठी गीत गायन, वर्ग सजावट, एकपात्री अभिनय इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांसाठी केंद्रस्तरावर परीक्षक म्हणून श्रीमती मेघाराणी दिनेश जोशी यांना आमंत्रित केले होते. तसेच एकपात्री अभिनय स्पर्धेसाठी तालुकास्तरीय परीक्षक म्हणून त्यांनी कार्य केले. या कार्यासाठी मेघाराणी जोशी यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

### नवरात्रीनिमित्त गरबानृत्य

दि. ७ ऑक्टोबर २०२४ रोजी विद्यार्थ्यांसाठी गरबा नृत्य व दांडियाचे आयोजन करण्यात आले. इ. १ली ते ७वीच्या विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी पोशाख परिधान करून गरबा नृत्याचा मनसोक्त आनंद घेतला. विद्यार्थी व शिक्षकांनी मराठी व हिंदी गाण्याच्या तालावर सुंदर गरबा व नृत्य सादर केले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना देवीच्या साडेतीन शक्ती-पीठांची माहिती सांगितली. नवरात्र म्हणजे देवीचा जागर, तिच्यातील शक्तीचा जागर असे सांगून विद्यार्थी व शिक्षकांना नवरात्रीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. विद्यार्थी व शिक्षकांनी गरबा नृत्याचा मनसोक्त आनंद लुटला.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**संचालक : श्री. दिनेश पि. मिसाळ**

**पर्यवेक्षक : श्रीमती श्रीजा बा. नायर**

### कलागुण नैपुण्य स्पर्धा

सांस्कृतिक कलादर्पण आयोजित आंतरशालेय कलागुण नैपुण्य स्पर्धा रविवार दि. १ सप्टेंबर २०२४ रोजी बेडेकर कॉलेज, ठाणे येथे संपन्न झाल्या. यामध्ये गीतगायन स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, नृत्य स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा इ. स्पर्धांचा समावेश करण्यात आला होता. या विविध स्पर्धांमध्ये माध्यमिक इंग्रजी विभागाच्या पुढील विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी यश संपादन केले.

| विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता | स्पर्धा | क्रमांक |
|---|---|---|---|
| कु. ओम पवार | ५ वी | वेशभूषा | प्रथम |
| कु. ओम पवार | ५ वी | नृत्य | द्वितीय |
| कु. समीक्षा साळुंखे | ५ वी | गीत गायन | उत्तेजनार्थ |
| कु. आर्या कदम | ७ वी | वक्तृत्व | द्वितीय |
| कु. मिहीर मिरजे | ६ वी | वक्तृत्व | उत्तेजनार्थ |
| कु. सुमित राजगुरु | ६ वी | वक्तृत्व | उत्तेजनार्थ |
| कु. प्रणाली कांबखे | ७ वी | वक्तृत्व | उत्तेजनार्थ |
| कु. प्रितिका पारवे | ९ वी | वक्तृत्व | उत्तेजनार्थ |
| **शिक्षकाचे नाव** | | **स्पर्धा** | **क्रमांक** |
| श्री . जगन्नाथ कोळी | | वेशभूषा | द्वितीय |

### चित्रकला स्पर्धेतील सुयश

संदीप नाईक प्रतिष्ठान, नवी मुंबई आयोजित जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत एकूण ६० शाळांमधील ५ हजार विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्यापैकी माध्यमिक इंग्रजी विभागाच्या इ. १० वीच्या कु. रवितनया दादासो चव्हाण या विद्यार्थीनीने इ. ८ वी ते १०वी या गटातून तृतीय क्रमांक पटकावला. तिला प्रमाणपत्र व रोख रक्कम रु. ५,०००/- देऊन गौरविण्यात आले. तसेच कु. अनुष्का राहुल ठाकरे हिने उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला. तिला प्रमाणपत्र व रोख रक्कम रु. ३,०००/- देऊन गौरविण्यात आले. तर इ. ५वी ते ७वी गटातून कु. गार्गी किशोर गोळे हिने उत्तेजनार्थ क्रमांक मिळविला तिला रोख रक्कम रु. ३,०००/- व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

### क्रीडा रत्न पुरस्कार

स्व. उत्तमरावजी ढिकले स्पोर्टस् फाउंडेशन, नाशिक, फेन्सिंग असोसिएशन ऑफ रायगड व रायगड जिल्हा जम्परोप असोसिएशन आयोजित क्रीडारत्न पुरस्कार वितरण सोहळा रविवार दि. १ सप्टेंबर २०२४ रोजी श्री. गोरक्षनाथ मंदिर, वहाळ, नवी मुंबई येथे पार पडला. या सोहळ्यात श्री. सुहास नवनाथ राऊळ या क्रीडा शिक्षकांचा 'क्रीडारत्न पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला.

### सदाचार चिंतनी वक्तृत्व स्पर्धा

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग आयोजित सदाचार चिंतनी वक्तृत्व स्पर्धा दि. ६ सप्टेंबर २०२४ रोजी घेण्यात आली. या स्पर्धेत कु. अमृता संतोष अडसुळे हिने प्रथम, कु. श्रुती रमेश पानसरे हिने द्वितीय तर कु. गौरी अशोक आहेर हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

### कुस्ती स्पर्धा

दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी कुस्ती स्पर्धा नवी मुंबई पोलीस मुख्यालय, कळंबोली येथे घेण्यात आली. सदर स्पर्धेत माध्यमिक इंग्रजीच्या पुढील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले व त्यांची मुंबई विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली.

| विद्यार्थ्याचे नाव | प्राप्त पदक |
|---|---|
| कु. श्रुती पानसरे | सुवर्ण |
| कु. सिमरनकुमारी सिंग | सुवर्ण |
| कु. ऐश्वर्या चव्हाण | सुवर्ण |
| कु. अर्शलीन चहल | सुवर्ण |
| कु. आरुषी सिंग | सुवर्ण |
| कु. वेदांत टाव्हरे | सुवर्ण |
| कु. गौरव वणवे | रौप्य |
| कु. श्रेया नवले | रौप्य |
| कु. आस्था तिवारी | रौप्य |
| कु. श्रद्धा यादव | रौप्य |
| कु. आर्या सिंग | रौप्य |
| कु. अनुज गरजे | कांस्य |
| कु. देवेंद्र चव्हाण | कांस्य |
| कु. ऋद्धिक बारे | कांस्य |
| कु. कृपा शितकर | कांस्य |
| कु. रिया चौरसिया | कांस्य |
| कु. पूर्वा पवार | कांस्य |
| कु. ओमकार चव्हाण | कांस्य |

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**पर्यवेक्षक : सौ. अस्मिता सलगर**

### शिक्षक सन्मान सोहळा

संदीप नाईक प्रतिष्ठान तर्फे शिक्षक दिनानिमित्त आयोजित केलेल्या शिक्षक सन्मान सोहळ्यात शिक्षिका श्रीमती नीता हिरवे यांना शैक्षणिक क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

## विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

### मैत्री फाउंडेशनतर्फे शिक्षक सन्मान

दि. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी नवरात्रीनिमित्त मैत्री फाउंडेशन, नेरुळ, नवी मुंबई यांच्यातर्फे 'सोहळा तिचा, तिच्यातील नवदुर्गेचा' या वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्रीमती आरती औचर यांना त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आणि शैक्षणिक योगदानाबद्दल सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

### वाचन प्रेरणा दिन

दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. विद्यार्थ्यांनी भाषणे केली. आपल्या भाषणातून डॉ. कलाम यांचे विचार मांडले. तसेच वाचनाचे फायदे व महत्त्वही सांगितले. काही विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनावर आधारित कविता सादर केल्या. विद्यार्थ्यांना ग्रंथालयातून वाचनाची पुस्तके देण्यात आली. विद्यार्थ्यांनी वाचनाचा आनंद घेतला. हे पुस्तक मला का आवडले यावर आपले मत मांडले. वाचनावर

आधारित घोषवाक्य उच्चारुन कार्यक्रमाची सांगता झाली.

### कुलगुरू दादासाहेब केतकर यांची ७४ वी पुण्यतिथी

दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी कुलगुरू दादासाहेब केतकर यांच्या ७४व्या पुण्यतिथीनिमित्त दादांच्या पवित्र स्मृतीस वंदन करण्यात आले. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती मनीषा मुळीक, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक यांच्या हस्ते कै. दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. सर्व शिक्षकांनी दादांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले. श्रीमती राधिका भोसले यांनी आपल्या भाषणातून दादांच्या कार्याबद्दल माहिती दिली. कै. दादांचा एखादा तरी गुण प्रत्येकाने आत्मसात करू आणि खऱ्या अर्थाने दादांना आदरांजली वाहू असे मत प्रत्येकाने आपल्या भाषणातून व्यक्त केले. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकाने आपला वाटा उचलावा व शाळेचा नावलौकीक वाढवावा अशा सदिच्छेसह कार्यक्रमाची सांगता झाली.

### मतदारांसाठी प्रतिज्ञा वाचन

दि. ९ ऑक्टोबर रोजी शालेय सभागृहात मतदारांसाठी प्रतिज्ञा वाचन घेण्यात आले. नोव्हेंबर महिन्यात घेण्यात येणाऱ्या विधानसभा निवडणुकीबद्दल मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर प्रतिज्ञेसाठी मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. श्रीमती नूतन गवांदे यांनी प्रतिज्ञेचे वाचन केले व मतदारांचे कर्तव्य याविषयी माहिती सांगितली.

### अभिनंदनीय

दि. १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२४ दरम्यान घेतलेल्या वाचन महोत्सव उपक्रमात मी वाचन केलेल्या पुस्तकावर माझे मत या लेखन स्पर्धेत इ. ३री तील कु. काव्या किरण जाधव या विद्यार्थिनीची तालुका स्तरावर निवड झाल्याबद्दल तिचे खूप खूप अभिनंदन!

### मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानात विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेचा ठाणे जिल्ह्यातून प्रथम क्रमांक

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा-२ हे अभियान राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांकरीता दि. ५ ऑगस्ट ते १८ सप्टेंबर २०२४ या काळात राबविले गेले. या अभियानात पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ मधील विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेने ठाणे जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात खाजगी शाळा गटातून विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाने बाजी मारली व ठाणे जिल्ह्यातून प्रथम क्रमांक प्राप्त करत रु. ११ लाखांचे बक्षीस प्राप्त केले. शाळेत हवेशीर, डिजिटल बोर्ड असलेल्या सुसज्ज वर्गखोल्या, हवेशीर सभागृह, आधुनिक संगणक कक्ष, मिनी सायन्स सेंटर, स्वतंत्र व सुंदर अशी परसबाग, विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था, हात धुण्यासाठी हँडवॉश स्टेशन यासारख्या अनेक भौतिक सुविधा आहेत. विद्याभवन शाळेचे विद्यार्थी दरवर्षी शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत झळकतात. शाळेला हरित शाळा पुरस्कार, आदर्श शाळा पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. या अभियानात शिक्षक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी सर्वजण सहभागी झाले. शाळेला मिळालेल्या या यशाबद्दल कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संस्थेचे सर्व संचालक मंडळ, अनुसंधान समिती सदस्य प्राचार्य कृष्णाजी शिरकांडे आणि मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांनी कौतुक केले आणि शिक्षक, पालक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी या सगळ्यांच्या सहकार्यातून हे यश मिळाले असे सांगून सर्वांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### शिष्यवृत्ती कार्यशाळा

दि. २५ सप्टेंबर २०२४ रोजी नवनीत तर्फे शिष्यवृत्ती मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांसाठी मो. ह. विद्यालय, ठाणे येथे मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये शिष्यवृत्ती विषयांशी संबंधित विविध क्लुप्त्या आणि सोप्या पद्धतीने शिष्यवृत्ती विषय शिकवण्याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. शिष्यवृत्ती परीक्षेचा अभ्यास कसा करावा, सराव कसा करावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सौ. राधिका अक्षय भोसले या कार्यशाळेस उपस्थित होत्या.

### ऑनलाईन प्रशिक्षण

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र तर्फे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू करण्यात आलेल्या आनंददायी शनिवार या उपक्रमांतर्गत दि. १० ऑगस्ट २०२४ रोजी ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. आनंददायी शनिवारचे नियोजन कसे करावे ? तसेच इ. ६वी पासून शैक्षणिक वर्षात दप्तरविना उपक्रम कसे राबवावे याविषयी माहिती देण्यात आली. सदर प्रशिक्षण श्रीमती आरती किशोर औचर यांनी घेतले.

### फुफ्फुस कार्यक्षमता चाचणी

दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी विभागातील इ. २री व इ. ७वी या वर्गातील विद्यार्थ्यांची एक विशिष्ट आरोग्य तपासणी घेण्यात आली. ही आरोग्य तपासणी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. हवेच्या गुणवत्तेत होत असलेल्या बदलामुळे त्या हवेचा आपल्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा सखोल अभ्यास करण्यासाठी पर्यावरण संस्था टी. एस. एल. प्रदूषण मंडळाच्या अंतर्गत विद्यार्थ्यांची फुफ्फुस कार्यक्षमता चाचणी घेण्यात आली. विद्यार्थ्यांची फुफ्फुस कार्यक्षमता चाचणी, वजन, उंची, बी. एम. आय., रक्तदाब यासारख्या चाचण्या मुलांसाठी व शिक्षकांसाठी विनाशुल्क करण्यात आल्या.

### अभिनंदनीय वार्ता

४४ वा इंडियन नॅशनल ॲबॅकस कॉम्पिटिशन फेस्टिव्हल BRAINOBRAINFEST*२०२४ ही स्पर्धा दि. २२ ऑक्टोबर २०२४ रोजी चेन्नई येथे संपन्न झाली. या स्पर्धेत इ. २ री तील कु. निहारिका प्रबोध फडके या विद्यार्थिनीस सुवर्ण पदक प्राप्त झाले.

### दिवाळी पार्टी

दि. २६ ऑक्टोबर २०२४ रोजी सभागृहात दिवाळी पार्टी आयोजित करण्यात आली. सर्व विद्यार्थी रंगीबेरंगी वेशभूषा परिधान करून आले होते. शाळेत विद्यार्थ्यांनी बनवलेले कंदिल, भेटकार्ड यांनी शाळा सुशोभित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी रांगोळी काढून, पणत्या सजवून वर्ग सजवले. सर्व विद्यार्थ्यांना सोनपापडी वाटून दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी नृत्य व गायनाचा आनंद घेतला. दिवाळीत कोणत्याही प्रकारचे फटाके फोडणार नाही व प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करू अशी शपथ घेण्यात आली. सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा देऊन प्रथम सत्राची सांगता झाली.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

### मंथन सामान्य ज्ञान परीक्षा

मंथन सामान्य ज्ञान परीक्षेत विद्यार्थी कु. प्रत्युष बाबाजी पडवळ, इ. ३ री याने केंद्रात प्रथम, जिल्हास्तरावर अकरावा व राज्यस्तरावर सोळावा क्रमांक संपादित केला. सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्याला गौरविण्यात आले.

### विविध कलागुण स्पर्धा

सांस्कृतिक कलादर्पण, ठाणे आयोजित आंतरशालेय चौफेर विविध कलागुण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये पुढील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सुयश संपादन केले. प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र

देण्यात आले आणि उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | स्पर्धा | क्रमांक |
|---|---|---|---|
| कु. प्रत्युष पडवळ | २/अ | वक्तृत्व | प्रथम |
| कु. विराट घोरपडे | २/अ | वक्तृत्व | प्रथम |
| | | वेशभूषा | उत्तेजनार्थ |
| कु. स्पृहा नलावडे | ३/अ | वेशभूषा | प्रथम |
| | | वक्तृत्व | उत्तेजनार्थ |
| कु. अनया गलगली | ४/अ | वेशभूषा | द्वितीय |
| कु. आर्यन नागरगोजे | २/अ | नृत्य | द्वितीय |
| कु. वेदांत खामकर | ४/अ | वेशभूषा | उत्तेजनार्थ |
| कु. स्पंदन भगत | २/अ | वेशभूषा | उत्तेजनार्थ |
| कु. प्रिंस कांबळे | ४/अ | वक्तृत्व | उत्तेजनार्थ |
| कु. यशस्वी शिंदे | २/ब | नृत्य | उत्तेजनार्थ |

**विद्यार्थी गट - चित्रकला स्पर्धा**

| विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|
| कु. नेहा अशोक शिरसाट | प्रथम |
| कु. शुभ सुशीलकुमार पांडे | प्रथम |
| कु. दुर्वा प्रवीण म्हात्रे | द्वितीय |
| कु. स्पृहा संजय नलावडे | द्वितीय |
| ५६ विद्यार्थ्यांना | उत्तेजनार्थ बक्षिसे |

**विद्यार्थी गट - हस्ताक्षर स्पर्धा**

| | |
|---|---|
| कु. दिव्यांश हेमंत धाडवे | प्रथम |
| कु. अहिल अबेद शेख | प्रथम |
| कु. भार्गव सचिन साळुंखे | द्वितीय |
| कु. जितेश राजू शिंदे | द्वितीय |
| ५४ विद्यार्थ्यांना | उत्तेजनार्थ बक्षिसे |

**विद्यार्थी गट - निबंध स्पर्धा**

| | |
|---|---|
| कु. प्रत्युष बाबाजी पडवळ | द्वितीय |
| कु. सोहम योगेश सावंत | द्वितीय |
| ६ विद्यार्थ्यांना | उत्तेजनार्थ बक्षिसे |

**विद्यार्थी गट - भेटकार्ड तयार करणे**

| | |
|---|---|
| कु. स्पंदन नवीन भगत | द्वितीय |
| कु. क्रिशिका राजेश बोऱ्हाडे | द्वितीय |
| ११ विद्यार्थ्यांना | उत्तेजनार्थ बक्षिसे |

**शिक्षक गट**

| शिक्षकांचे नाव | स्पर्धा | प्राप्त क्रमांक |
|---|---|---|
| श्रीमती प्रतिभा कुमकर | निबंध | द्वितीय |
| श्रीमती फरहाना चौगले | हस्ताक्षर | द्वितीय |
| श्रीमती प्रतिभा प्रविण कुमकर | हस्ताक्षर | उत्तेजनार्थ |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन!** ✲✲✲

**✲ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ शाखा, नवीमुंबई ✲**



'रोटरी क्लब गुरूसन्मान आयडियल टीचर ॲवॉर्ड' बक्षीस पात्र शिक्षकांसोबत उजवीकडून कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, श्रीमती प्रतिभा कुमकर, श्रीमती अमृता झोडपे, श्रीमती फरहाना चौगुले आणि मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक




'लायन्स क्लब ऑफ नवी मुंबई चॅम्पियन्स्' तर्फे कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांना 'शिक्षक रत्न' म्हणून सन्मानित करताना लायन्स क्लबचे श्री. प्रताप मुदलीयार, समवेत श्री. संजीव सूर्यवंशी व श्री. प्रवीण सरनाईक

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ शाखा, नवीमुंबई ❊



'इनरव्हील क्लब ऑफ न्यू बॉम्बे सीसाईड' यांच्यातर्फे विद्याभवन प्राथमिक मराठी विभागास देणगी दिलेला लॅपटॉप अध्यक्षा श्रीमती दमन यादव व त्यांचे सहकारी यांचेकडून स्वीकारताना कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ व मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ



विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या टाकाऊ पासून टिकाऊ वस्तूंचे प्रदर्शन पाहताना नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग उपायुक्त श्रीमती संघरत्ना खिल्लारे, समवेत कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ व विद्यार्थी



विद्यार्थ्यांनी बनविलेल्या टाकाऊपासून टिकाऊ वस्तू प्रदर्शनास भेट देऊन त्यांचे कौतुक करताना नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे



श्रीजी टेक्नॉलॉजी तर्फे विद्यार्थी व शिक्षकांना अग्निशमन प्रशिक्षण देताना श्री. विशाल लवटे

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय
## तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक
**संचालक : श्री. अमोल म. जोशी**
**मुख्याध्यापक : श्री. शरद कोठावदे**

### महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती

दि. २ आक्टोबर २०२४ रोजी विद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. अनेक विद्यार्थ्यांनी दोन्ही महापुरुषांच्या जीवनाविषयी औचित्यपूर्ण भाषणे केली. श्री. सुकदेव निंबेकर यांनी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवनातील विविध उदाहरणांद्वारे त्यांनी राष्ट्र सेवेसाठी केलेल्या महान कार्याची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. आपल्या मनोगतात पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी गांधीजी व शास्त्रीजी यांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करून त्यांचे गुण अंगीकारण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. मंथन वाळुंज यांनी केले. सूत्रसंचालन सौ. सुषमा अमृतकर यांनी केले. उपस्थितांचे आभार सौ. स्वाती भावसार यांनी मानले.

### अभिनंदनीय

दि. ९ ऑक्टोबर २०२४ रोजी जळगाव येथे झालेल्या जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत 'क्रॉसकंट्री' या खेळात कु. लक्ष्मी दत्तू सराई व कु. धनश्री संतोष ढोंन्नर या विद्यार्थिनींनी चमकदार कामगिरी करत यश संपादन केले. कु. लक्ष्मी दत्तू सराई व कु. धनश्री संतोष ढोंन्नर या विद्यार्थिनींची विभागीय पातळीवर निवड झाली आहे. त्यांना पर्यवेक्षक श्री. संजय जोशी व क्रीडा शिक्षक श्री. संजय गीते यांचे मार्गदर्शन लाभले.

### वाचन प्रेरणा दिन

दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉक्टर ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिन - वाचन प्रेरणा दिन विविध उपक्रमांद्वारे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांसाठी 'ग्रंथालयातील मला आवडलेले पुस्तक' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्राचार्य श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी झालेल्या कार्यक्रमात कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांनी डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांचे जीवन व वाचनाचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देताना वाचन संस्कृती जोपसण्याचे आवाहन केले. याप्रसंगी प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांनी डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्याप्रमाणे आपले ध्येय निश्चित करून त्यानुसार आयुष्याची वाटचाल करण्याचे आवाहन केले. या दिनाचे औचित्य साधून शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी किमान एक पुस्तक ग्रंथालयास भेट देण्याचे आवाहन करण्यात आले होते त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. साहेबराव ठोंबरे, सूत्रसंचालन श्रीमती संगिता कुंवर यांनी केले तर आभार श्रीमती सोनाली तुंगार यांनी मानले.

### कै. दादासाहेब केतकर स्मृती दिन

दि. १६ ऑक्टोबर रोजी कुलगुरू कै. दादासाहेब केतकर यांना स्मृती दिनानिमित्त आदरांजली वाहण्यात आली. प्राचार्य श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी प्रतिमा पूजन केले. श्री लक्ष्मण चव्हाण यांनी कै. दादांचा जीवन प्रवास उलगडला. श्री. संजय जोशी यांनी आपल्या मनोगतातून संस्थेच्या स्थापनेत दादांच्या बहुमोल योगदानाची महिती देत आदरांजली वाहिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. सुरेश वाघमारे, सूत्रसंचालन सौ सुषमा अमृतकर यांनी केले. आभार श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी मानले.

### हळदी कुंकू कार्यक्रम

दि. १० ऑक्टोबर २०२४ रोजी शारदीय नवरात्री निमित्ताने कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी हळदी कुंकू कार्यकम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी देवी शारदेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले होते. कु. संगिता ढोंन्नर, कु. गौरी कडलग या विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतातून स्त्रियांच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी मार्गदर्शन करताना ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांनी आपल्या संस्कृतीतील विविध अवतारातील स्त्रीशक्ती बाबत महिती दिली. या प्रसंगी विद्यार्थिनींनी विविध नृत्य आविष्कार सादर करत कार्यकमात रंगत आणली. यावेळी सर्वांना अल्पोपहार देण्यात आला. ***

**❊ माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक ❊**



**हळदी कुंकू समारंभ प्रसंगी कनिष्ठ महाविद्यलयाच्या विद्यार्थिनी व ग्रंथपाल सौ. अर्चना गीत**

# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी**
**मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

### गुरूवर्य कै. डॉ. गजानन श्रीपत तथा अण्णासाहेब खैर पुण्यतिथी

दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षकवृंदांनी गुरूवर्य अण्णासाहेब खैर यांचे प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी गुरूवर्य डॉ. अण्णासाहेब खैर यांनी संस्था विकासासाठी केलेल्या कार्याची माहिती सांगितली.

### शिक्षकदिन

दि.५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षकदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. पंकज पवार, श्री. नामदेव चौरे म.न.पा विद्यालय मखमलाबाद नाशिक, कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षकवृंदांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे बालपण, शिक्षण आणि राजकीय कार्याविषयी माहिती सांगितली. प्रमुख अतिथी श्री. पंकज पवार यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे जीवनातील प्रेरक प्रसंग कथन केले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी सर्व शिक्षकांचा सत्कार

करून शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. इ. ९वी - १०वीच्या विद्यार्थ्यांनी अध्यापनाचे कामकाज केले आणि आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी चि. भरत दराने इ. ९ वी याने केले. आभार चि. शुभम खांडवी इ. १० वी या विद्यार्थ्याने मानले.

**श्री गणेशाची प्रतिष्ठापना**

विद्यालयात गणेशोत्सव उत्साहत साजरा करण्यात आला. दि. ७ सप्टेंबर २०२४ रोजी श्री. अमोल जोशी यांचे हस्ते श्री गणेश प्रतिष्ठापना करण्यात आली. या कार्यक्रमप्रसंगी सर्व संस्था कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी विद्यालयात श्री गणपती अथर्वशीर्ष सहस्त्रावर्तन घेण्यात आले. शिक्षिका सौ. तेजश्री जोशी आणि श्रीमती अर्चना केकाण यांनी विद्यार्थ्यांना अथर्वशीर्षाची संथा दिली.

गणेशोत्सवात विद्यालयात विविध स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धांत यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे

**रांगोळी स्पर्धा**

**इयत्ता पाचवी ते सातवी गट**

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| प्रथम | चि. देवेंद्र सोमनाथ भोये | सहावी |
| द्वितीय | चि. राहुल होनाजी खंबाईत | सातवी |
| तृतीय | चि.राहुल केशव राउत | पाचवी |

**इयत्ता आठवी ते दहावी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. मिलिंद कांतीलाल भोये | दहावी |
| द्वितीय | चि. गौरव सोमनाथ चौधरी | आठवी |
| तृतीय | चि.विशाल सुनील राउत | आठवी |

**गीतगायन स्पर्धा**

**इयत्ता पाचवी ते सातवी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. आदित्य संजय धांडे | सातवी |
| द्वितीय | चि. देवेंद्र सोमनाथ भोये | सहावी |
| तृतीय | चि. नवीनकुमार किरण गायकवाड | पाचवी |

**इयता आठवी ते दहावी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. शुभम विलास खांडवी | दहावी |
| द्वितीय | चि. गणेश संपत गोडे | आठवी |
| तृतीय | चि. चिराग भारत रावल | नववी |

**श्री गणेश रेखाटन स्पर्धा**

**पाचवी ते आठवी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. राहुल होनाजी खंबाइत | सातवी |
| द्वितीय | चि. देवेंद्र सोमनाथ भोये | सहावी |
| तृतीय | चि. रोशन जगदीश चौधरी | सहावी |

**आठवी ते दहावी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि.ओम प्रभाकर साळवे | आठवी |
| द्वितीय | चि. साहिल संतोष पाटील | नववी |
| तृतीय | चि. प्रेम नामदेव साबळे | दहावी |

**निबंध स्पर्धा**

**पाचवी ते आठवी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. मानव सुरेश तुंगार | सातवी |
| द्वितीय | चि. दुर्लभ केवळ जोपळे | सातवी |
| तृतीय | चि. देवेंद्र सोमनाथ भोये | सहावी |

**मोठा गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. ईशांत उत्तम गवळी | दहावी |
| द्वितीय | चि.सागर देवदास ताठे | नववी |

**हिंदी दिन**

दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी विद्यालयात हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शिक्षिका श्रीमती सविता चव्हाण यांनी हिंदी भाषेचे महत्त्व सांगितले. हिंदी दिनानिमित्त विद्यालयात हिंदी गीतगायन स्पर्धा घेण्यात आली. इ. ५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांनी विविध हिंदी गीत सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. श्री. तुकाराम मंडले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. मनीषा साठे**

## पूर्व प्राथमिक विभाग

### भोंडला उत्सव साजरा

दि. ११ ऑक्टोबर २०२४ रोजी भोंडला हा सण साजरा करण्यात आला. प्रारंभी देवी सरस्वतीची पूजा करण्यात आली. आणि त्यानंतर ''ऐलमा पैलमा गणेश देवा'' या गीताने भोंडल्याची सुरूवात झाली. शिक्षिकांनी विद्यार्थ्यांसह भोंडल्याच्या गीतांचे गायन केले. त्यानंतर झालेल्या भजन गायनाने वातावरण प्रफुल्लित झाले. विद्यार्थ्यांनी गरब्याचाही आनंद लुटला. काही विभाग प्रमुखही या कार्यक्रमात सहभागी झाले. मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे यांनी सर्वांना उत्तम आरोग्य आणि भरभराटीसाठी शुभेच्छा दिल्या.

### शिबीराचे आयोजन

दि. २१ ऑक्टोबर २०२४ रोजी गरजूंना मदत करण्यासाठी देणगी विषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. वस्तूंचा पुनर्वापर, पुनर्निर्मिती या उपक्रमांमध्ये लहान मुलांनी सहभाग घेतला. या उपक्रमाची संकल्पना तसेच विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी मदत करणाऱ्या गोष्टींच्या प्रभावी पुनर्वापराबद्दल शिक्षित करणे, तसेच गरजूंना मदत करणे हा या कार्यक्रमामागील हेतू होता.

या उपक्रमात लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये चांगली नैतिक मूल्ये रुजवण्याच्या महत्त्वावरही भर देण्यात आला. विद्यार्थ्यांना उद्याचे जबाबदार नागरिक बनवण्याचा उद्देशही यामागे होता. विद्यार्थ्यांनी त्यांचे वापरलेले कपडे, खेळणी, बूट इत्यादी क्वालिटी सिटी नाशिक उपक्रमांतर्गत श्री रामकृष्ण आरोग्य संस्था यांचेकडे उत्साहाने दान करण्यासाठी दिले. लोकांच्या गरजेनुसार ते सामान वितरित केले गेले. मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे विद्यार्थ्यांच्या दयाळू वृत्तीने भारावून गेल्या. त्यांनी मुलांच्या दातृत्त्वाचे कौतुक केले.

### दिवाळी सण साजरा

दि. २५ ऑक्टोबर २०२४ रोजी दिवाळी सण साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने सर्व शाळा पणत्या, आकाश कंदील व तोरणे लावून सजविण्यात आली होती. विद्यार्थ्यांना दिवाळीच्या पाचही दिवशी करण्यात येणाऱ्या पूजेची माहिती देण्यात आली. वसुबारसेला गाईची पूजा, धनत्रयोदशीला धन्वतरींची पूजा, नरकचतुर्दशीला अभ्यंग स्नान, लक्ष्मीपूजनाच्या दिवशी लक्ष्मीची पूजा आणि भाऊबीज आदींचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. या दिवशी दिवाळीचे ''दिवाळी आयी मस्ती छायी'' हे गाणे गात सर्व शाळेतील वातावरण आनंदमय झाले. विद्यार्थ्यांनी हा दिवस खूप आनंदात व उत्साहात साजरा केला. दिवाळी सणातील प्रत्येक दिवसाचे महत्त्व कृतीतून अधोरेखित करण्यात आले. 'दिवाळी सणाचा आनंद सर्वांनी एकत्रित साजरा करावा. आपापसातील प्रेम टिकवून ठेवावे' असे मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे यांनी विद्यार्थ्यांना दिवाळी शुभेच्छा देत सांगितले.

***

**आपला पत्ता बदललेला आहे का?**
**समाचार संदर्भातील आपला बदललेला पत्ता त्वरीत कळवावा ही विनंती.**
**पत्ता कळविताना जुना व नवा दोन्ही पिन कोड तसेच आपला ईमेल आयडी सुध्दा कळवावा म्हणजे आपणास ई-समाचार पाठविणे सोईचे होईल.**
pvgsamachar@gmail.com
**या ईमेल आयडी वर कळवावे.**
**संपादक**

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

## प्राथमिक विभाग

### महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंती उत्साहात संपन्न

दि. २ ऑक्टोबर २०२४ रोजी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महात्मा गांधी यांच्या स्वच्छतेच्या शिकवणुकीवर विद्यार्थ्यांनी छोटेसे नाटक सादर केले.

मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले. शिक्षिका सौ. माधुरी अहिरे यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्याविषयी माहिती दिली. इ. ४ थी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्रींच्या कार्याची माहिती दिली.

### डॉ. काकासाहेब देवधर स्मृतीपूजन

दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी डॉ. काकासाहेब देवधर यांच्या प्रतिमेचे पूजन शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून करण्यात आले. शिक्षिका सौ. वैशाली मुंदाणकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ. काकासाहेब देवधर यांच्या कार्याची माहिती सौ. माधुरी गवळी यांनी दिली. या कार्यक्रमास मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य, मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील, मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती (वाचन प्रेरणादिन) उत्साहात संपन्न

दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती निमित्त मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील आणि सौ. प्रतिमा वैद्य यांच्या हस्ते डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. शिक्षिका सौ. हर्षदा सोनवणे यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

### जागतिक अंधदिन कार्यक्रम संपन्न

दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी जागतिक अंधदिन साजरा करण्यात आला. शिक्षिका सौ. जयश्री खालकर यांनी अंधदिन साजरा करण्याचा हेतू विद्यार्थ्यांना सांगितला. आपण दृष्टीबाधित व्यक्तींना कशा प्रकारे मदत करू शकतो, हे त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

### हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा

इ. ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांची हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी इ. ५ वीचे २९ विद्यार्थी आणि इ. ६ वीचे प्राथमिक परीक्षेसाठी ३७ इयत्ता ७ वी प्रवेशिका परीक्षेसाठी २० असे विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. या परीक्षेचा निकाल पुढीलप्रमाणे

**इ. ५ वी विशेष योग्यता (बालबोधिनी)**
**विद्यार्थ्याचे नाव**

कु. स्वराज ज्ञानेश्वर सोज्वळ
कु. रिद्धी देविदास आहेर
कु. शर्वरी सचिन व्यवहारे
कु. दक्ष देवानंद शिराळ
कु. तेजस्विनी संदीप धात्रक
कु. श्रद्धा नरेंद्र दंडगव्हाळ
कु. मनस्वी रवींद्र वडजे
कु. आर्या सचिन जाधव
कु. यज राहुल कळमकर
कु. सक्षम विष्णू महाले

**इयत्ता ६ वी (प्राथमिक)**

कु. आराध्या दिगंबर बोटवे

## चित्रकला स्पर्धा

ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीद्वारे चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शाळेतील विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. स्पर्धेत यश मिळवलेल्या विद्यार्थिनी पुढीलप्रमाणे.

| विद्यार्थिनीचे नाव | इयत्ता | बक्षीस |
|---|---|---|
| कु. सई सोनवणे | ६ वी | स्मृतिचिन्ह व पदक |
| कु. पूर्वा मुदगल | ४ थी | स्मृतिचिन्ह व पदक |
| कु. आराध्या लहामगे | ४ थी | पदक |
| कु. आराध्या दिवेकर | ५ वी | पदक |

## दादासाहेब केतकर पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न

दि. ११ ऑक्टोबर २०२४ रोजी दादासाहेब केतकर यांच्या पुण्यतिथी निमित्त मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी कै. दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन केले. शिक्षिका सौ. प्रियांका पाटील यांनी त्यांच्या कार्याची माहिती दिली.

## पर्यावरणपूरक दिवाळी साजरी

शाळेमध्ये पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यात आली. या उपक्रमांतर्गत वेगवेगळे कार्यक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांना आपापल्या घरीही पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यास सांगण्यात आले. इ. १ली ते ७वीच्या विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी दिवे, सजावटीचे कंदील, आकर्षक ग्रीटिंगकार्ड बनवली. सर्व विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची शपथ घेतली. सर्व शिक्षकांनी आकाश कंदील व दिवे लावून, तसेच रांगोळी काढून शाळेची सजावट केली. शिक्षिका सौ. शुभांगी देशमुख यांनी दीपावली सणाविषयी माहिती दिली. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य, मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील आणि सौ. मनीषा साठे यांनी कार्यालयाचे पूजन केले. सर्वांनी उत्साहात आरती म्हटली. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. ✻✻✻

### ✻ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक ✻



महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती कार्यक्रमानिमित्त महात्मा गांधी यांच्या स्वच्छतेच्या शिकवणुकीवर छोटेसे नाटक सादर करणारे विद्यार्थी



हिंदी राष्ट्रभाषा परीक्षेतील प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थी

# अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. एम. व्ही. भालेराव**

### वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

महाविद्यालयात डॉ. ए, पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. महाविद्यालयात पुस्तक प्रदर्शन भरवण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव होते. या प्रसंगी सर्व विभाग प्रमुख डॉ. अमोल रासने, डॉ. शिवाजी गवळी, डॉ. सोनाली जाधव, प्रा. सतीश भदाणे, प्रा. जगदीश कापडणीस, प्रा. संकेत चोरडिया, अकॅडेमिक डीन प्रा. डॉ. योगिता अहिरे, प्लेसमेंट अधिकारी श्री. इंद्रजीत सोनवणे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रा. सुहास धारणे, ग्रंथपाल श्री. संदीप दराडे, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थिनी कु. प्रणाली परदेशी आणि कु. धनश्री पैठणे यांनी केले. प्रा. सुहास धारणे आणि प्रा. ललित पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, तसेच भारताचे मिसाईलमॅन डॉ. ए पी जे कलाम यांच्याविषयी माहिती देताना ते एक लेखक, कवी होते. विज्ञान तंत्रज्ञान आणि अध्यात्मावर त्यांचे लेखन होते. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये वाचनाला खूप महत्त्व आहे हे पटवून देत त्यांनी वाचनाचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात अभ्यासाबरोबर अवांतर वाचन करायला पाहिजे असेही सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सोनाली काळे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु. अथर्व कुलकर्णी याने केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. निवृत्ती डावखर आणि दीपाली रायते यांनी प्रयत्न केले.

### महाविद्यालय आणि न्यू एज फायर प्रोटेक्शन इंडस्ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमानाने, आवळी दुमाला, ता. इगतपुरी येथे दिवाळी निमित्त करिअर मार्गदर्शन शिबिर आणि भेटवस्तू वितरण

मुंबई येथील न्यू एज फायर इंडस्ट्रीजचे संचालक डॉ. अशोक शहा यांच्या संकल्पनेतून आवळी दुमाला ता. इगतपुरी येथील ग्रामस्थांना दिवाळी फराळ व भेटवस्तू वाटप करण्यात आले. सदर उपक्रम महाविद्यालय, न्यू एज फायर प्रोटेक्शन इंडस्ट्रीज आणि स्किल कॅडमॅक्स टेक्निकल इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. हा उपक्रम स्किल कॅडमॅक्स टेक्निकल इन्स्टिट्यूटचे श्री. महेश चाळके यांच्या नियोजनाखाली संपन्न झाला. याप्रसंगी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकास योजनेअंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमाची माहिती गावातील तरुणांना देण्यात आली व त्यांना करिअर बाबत मार्गदर्शन करण्यात आले. सदर उपक्रमासाठी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, प्राचार्य डॉ. मनोज भालेराव व मेकॅनिकल विभागाचे विभाग प्रमुख डॉ. ए. आर. रासने यांचे मार्गदर्शन लाभले.

### एन. एल. पी. : शैक्षणिक यश आणि वैयक्तिक वाढीसाठी एक परिवर्तक - लेखक प्रा. डॉ. संदीप नंदराम दिवे. (एन. एल. पी. विषयी थोडी माहिती)

जागतिक आरोग्य संघटनेनुसार आत्महत्या हे १५-२९ वयोगटातील लोकांच्या मृत्यूचे दुसरे प्रमुख कारण आहे. (स्रोत - WHO Factsheet on Suicide Prevention, 17 June 2021). वर्ष २०२१ मध्ये भारतात १३००० हून अधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या (स्रोत - NCRM Report 2021, 29 Aug 2022). याच वर्षी महाराष्ट्रात १४०० हून अधिक विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची नोंद झाली (स्रोत - TOI, NCRM, 24 April 2023). ही आकडेवारी त्रासदायक असली तरी केवळ विद्यार्थ्यांसाठीच नव्हे तर पालक, शिक्षक, प्रशिक्षण वर्ग आणि शैक्षणिक संस्थांसाठी मोठ्या प्रमाणात एक जागृत करणारा संदेश आहे.

आजच्या वेगवान शैक्षणिक वातावरणामुळे विद्यार्थ्यांना सखोल शैक्षणिक अभ्यासक्रमापासून ते उत्कृष्ट कामगिरीच्या दबावापर्यंत अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. विद्यार्थी, कमी आत्मविश्वास, अपयशी होण्याची भीती आणि भविष्यातील अनिश्चिततेसह संघर्ष करताना दिसत आहेत. त्याच वेळी, तंत्रज्ञानातील सततचे बदल आणि माहितीचा सततचा प्रवाह त्यांना कारकिर्दीची उद्दिष्टे ठरवण्यापासून विचलित करीत आहेत.

येथेच न्यूरो लिंग्विस्टिक प्रोग्रामिंग (NLP) विद्यार्थ्यांची भावनिक स्थिती समजून घेण्यासाठी आणि सुधारण्यासाठी फायदेशीर ठरते. एन. एल. पी. ने, अनेक दशकांपासून, विद्यार्थ्यांना, करिअरच्या द्विधा मनःस्थितीतून मुक्त होण्यासाठी एक संरचित दृष्टीकोन देऊ केला आहे. लक्ष केंद्रित करण्यासाठी, प्रचंड आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी, तणावरहित शिक्षण घेण्यासाठी आणि उद्दिष्टे निश्चित करण्यासाठी, त्यांना एक साधन उपलब्ध करून देत आहे.

विकसित देशांमध्ये NLP चा मोठ्या प्रमाणावर मानसिक उपचारांसाठी एक प्रारंभिक पर्याय म्हणून वापर केला जातो. हा केवळ एक प्रचलित शब्द नसून विद्यार्थ्यांना कारकिर्द आणि जीवनावर नियंत्रण ठेऊन सक्षम बनवण्यासाठी एक गेम चेंजर आहे. वापरातील सहजता, खर्चातील परिणामकारकता आणि यशाचा उच्च दर लक्षात घेता हे NLP तंत्र अत्यंत प्रभावी असल्याचे आढळून आले आहे.

भारतासारख्या देशांमध्ये कमी जागरूकता आणि प्रशिक्षित NLP तज्ज्ञांचा अभाव असल्या कारणाने, याचा प्रवाह योग्य घटकांपर्यंत पोहोचू शकत नाही, हे एक कारण असू शकते. NLP बद्दलची जागरूकता आणि केवळ विद्यार्थ्यांचेच नव्हे तर सामान्य लोकांचेही मानसिक संतुलन बदलण्याची त्याची क्षमता वाढवण्याची मोठी गरज आहे. तथापि, गेल्या काही वर्षांत, प्रशिक्षित NLP व्यावसायिकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत असल्यामुळे अलीकडील घडामोडी उत्साहवर्धक आहेत.

NLP हा एक मानसशास्त्रीय दृष्टीकोन आहे जो आपण कसे विचार करतो (Neuro), आपण कसे संवाद साधतो (Linguistic) आणि आपण आपल्या मेंदू सोबत या संवादामार्फत कसे जोडले जातो (Programming), यामधील संबंध शोधतो. व्हिज्युअलायझेशन, अँकरिंग, डिसोसीएशन, रिफ्रेमिंग यासारख्या आधुनिक तंत्रांच्या मालिकेद्वारे, NLP, विचारांची पुनर्रचना करण्यासाठी, भावनांचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि वैयक्तिक आणि व्यावसायिक यशासाठी सकारात्मक सवयी विकसित करण्यासाठी एक व्यवहारिक उपाय प्रदान करते.

(लेखक एक कुशल NLP तज्ज्ञ असून, NLP च्या सहाय्याने त्यांनी दोन हजारहून अधिक विद्यार्थ्यांना तणावरहित शिक्षण घेण्याकरिता मार्गदर्शन केले आहे)

**बाल दिन उत्साहात साजरा**

दि. १४ नोव्हेंबर २०२४ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती 'बाल दिन' म्हणून साजरी करण्यात येते. महाविद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी कु. अक्षय धुमाळ याने केले. पंडित नेहरू यांच्या विषयी माहिती देताना कु. पल्लवी सोळंके हिने स्वातंत्र्याच्या उद्दिष्टाप्रती भारतीय जनतेला कटिबध्द बनवण्यात त्यांनी पार पाडलेली महत्त्वाची भूमिका तसेच त्यांनी 'भारतीय स्वातंत्र्य लीग'ची स्थापना केली आणि त्याचे सरचिटणीसही झाले. भारताला ब्रिटिश साम्राज्यापासून पूर्णपणे वेगळे करणे हा या लीगचा मूळ उद्देश होता. भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वाती पिंगळे आणि प्रा. योगिता मेधने यांनी केले. आभार प्रदर्शन कु. विशाखा राजापुरे हिने केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. निवृत्ती डावखर आणि दीपाली रायते यांनी प्रयत्न केले. ***

# कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी आणि जी.के.पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे

**संचालक : श्री. सुनिल रेडेकर**

**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**

## मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग

### अभिनंदनीय

दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित सुप्रा कॉम्पिटिशनमध्ये महाविद्यालयाने भारतामध्ये दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक आणि स्कीडपॅड टेस्ट आणि इंडोरन्स टेस्टमध्ये पहिले असे एकूण एक लाख साठ हजार रुपयांचे पारितोषिक मिळवले. टीम सुप्रा आणि त्यांचे मार्गदर्शक प्रा. महेश कांबळे, विभागप्रमुख डॉ. एम. एम. भूमकर यांचे संचालक श्री. सुनिल रेडेकर, प्रा. राजेंद्र कडुसकर, आणि प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांनी अभिनंदन केले.

### औद्योगिक भेट

✻ दि. ८ व ९ ऑक्टोबर २०२४ रोजी फायनल वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता एचपीपी वरसगाव येथे औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली. या प्रसंगी यांत्रिकी विभागातील प्राध्यापक डॉ. गणेश मोरे व प्राध्यापक श्री. जे. एस. कुलकर्णी उपस्थित होते.

✻ सोमवार दि. १४ ऑक्टोबर २०२४ रोजी यांत्रिकी विभागातील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता 'ET' विषयासाठी कात्रज डेअरीला औद्योगिक भेट आयोजण्यात आली. या प्रसंगी डॉ. आर. एल. एदलाबादकर व प्राध्यापक श्री. जे. एस. कुलकर्णी उपस्थित होते.

### डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती साजरी

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी IIC (इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल) दिवस साजरा करण्यात आला.

त्यावेळी ए. आय. डी. एस. विभागप्रमुख डॉ. मीनाक्षी अत्रे व ई. अँण्ड टी. सी. विभागप्रमुख डॉ. प्रसन्न शेटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी पीएच. डी. करणाऱ्या सर्व प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला.

### रक्तदान शिबिराचे आयोजन

दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी मेसा तर्फे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. त्यावेळी ६५ युनिट रक्त जमा झाले. या शिबिराचे आयोजन प्राध्यापक श्री. चिक्षे यांनी केले.

दि. १८ आणि २१ ऑक्टोबर २०२४ रोजी फाकटकर अकादमी द्वारे द्वितीय वर्ष विद्यार्थ्यांसाठी सॉलिडवर्क्स या विषयाचे एक सत्र आयोजित करण्यात आले होते. या कार्यशाळेचे आयोजन प्राध्यापक श्री. चीक्षे यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धां मध्ये कु. ओम जाधव, तृतीय वर्ष या विद्यार्थ्याने ६१ किलो मेन वेटलिफ्टिंग गटामध्ये द्वितीय पारितोषिक पटकावले. तसेच पॉवर लिफ्टिंग मध्ये कु. कर्तव्य खोरणे, द्वितीय वर्ष या विद्यार्थ्याने ५९ किलो पुरुष गटामध्ये प्रथम क्रमांकाचे व कु. प्राची कांबळे या विद्यार्थिनीने ४६ किलो महिला गटामध्ये द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

## इ ॲण्ड टी सी इंजिनिअरिंग विभाग

### शिक्षक दिन आणि अभियंतादिन साजरा

दि. १६ सप्टेंबर २०२४ रोजी स्टुडंट्स असोसिएशन अंतगर्त शिक्षक दिन आणि अभियंता दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर आणि अणुविद्युत आणि दूरसंचार विभागाचे विभागप्रमुख डॉ. प्रसन्न शेटे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन आणि सर विश्वेश्वरय्या मोक्षगुंडम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. या

प्रसंगी सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचा शुभेच्छा पत्र देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा. सौ. प्रिया देशपांडे आणि प्रा. निलेश कुचेकर यांनी आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी केले.

**Techcraft 2K24 चे आयोजन**

दि. २७ आणि २८ सप्टेंबर २०२४ रोजी इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिरिंग स्टुडंट्स असोसिएशन चा Techcraft 2K24 आयोजित केला. या कार्यक्रमाचे उद्घाटन संचालक श्री. सुनिल रेडेकर, प्रा. राजेंद्र कडुसकर आणि प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. या दोन दिवसीय कार्यक्रमामध्ये तंत्रज्ञानावर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. यामध्ये विविध महाविद्यालयाच्या स्पर्धकांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा. सौ. प्रिया देशपांडे आणि प्रा. निलेश कुचेकर यांनी आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी केले. या कार्यक्रमासाठी विभागप्रमुख डॉ. प्रसन्न शेटे यांनी मार्गदर्शन केले.

**डिजिटल सिग्नल प्रोसेसिंग या विषयावर कार्यशाळेचे आयोजन**

दि. ९ आणि १५ ऑक्टोबर २०२४ रोजी विद्यार्थ्यांसाठी 'डिजिटल सिग्नल प्रोसेसिंग (DSP)' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. Mathworks या कंपनीचे तज्ज्ञ श्री. कुणाल खंडेलवाल यांनी विद्यार्थ्यांना DSP या विषयाचा व्यावहारिक वापर आणि त्याचा AI तंत्रज्ञानाशी असलेला संबंध यावर भर दिला. DSP चा उपयोग करून वेगवेगळे अनुप्रयोग विद्यार्थ्यांनी विकसित करण्याचा अनुभव घेतला. डॉ. सौ. कल्याणी कुलकर्णी, प्रा. सौ. निकिता चौधरी आणि श्री. राजेश राठोड यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले. विभागप्रमुख डॉ. प्रसन्न शेटे यांनी श्री. कुणाल खंडेलवाल यांचे स्वागत केले. महाविद्यालयाचे डीन अॅकॅडेमिकस प्रा. महेश पोतदार या प्रसंगी उपस्थित होते.

**औद्योगिक भेटीचे आयोजन**

दि. १४ आणि १७ ऑक्टोबर २०२४ रोजी टेक्नोफोर इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड कासुर्डी, पुणे येथे द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. Techno four Electronics विविध प्रकारच्या उद्योगांना पूर्ण करणारी उच्च-तंत्र उत्पादने आणि उपायांची श्रेणी ऑफर करते - १. मेटल डिटेक्टर २. वजन तपासा ३. एक्स-रे तपासणी प्रणाली ४. कॉम्बो डिटेक्टर + मेटल डिटेक्टर. उत्पादनांच्या प्रात्यक्षिकानंतर, विद्यार्थ्यांसाठी विशेष शंका-निवारण सत्र आयोजित केले गेले. मेटल डिटेक्शन टेक्नॉलॉजी आणि उत्पादन विकासामध्ये गुंतलेल्या जटिल प्रक्रियांबद्दलची माहिती देऊन, टेक्नोफोरच्या टीमने सर्व प्रश्नांची सखोल उत्तरे देण्यासाठी वेळ दिला. तसेच विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिपची संधी देण्याचे टेक्नोफोरच्या प्रशासनाने मान्य केले. विद्यार्थ्यांना अनुभव देण्यासाठी महाविद्यालयाला सहकार्य करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली ज्यामुळे विद्यार्थ्यांना मौल्यवान औद्योगिक प्रदर्शन आणि अत्याधुनिक धातूवर काम करण्याची संधी मिळेल. या औद्योगिक भेटीचे सूत्रसंचालन प्रा. गौरी कुलकर्णी आणि प्रा. विभागप्रमुख डॉ. प्रसन्न शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या उपक्रमाला डी. टी. वर्पे, प्रा. एम. पी. पोतदार, प्रा. यू. ए. वाळके, प्रा. एन. डी. कुचेकर, प्रा. एन. डी. चौधरी आणि प्रा. कोमल वंजारे यांच्या संपूर्ण मार्गदर्शन व सहकार्याबद्दल त्यांचे विशेष आभार.

**डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती निमित्त इनोव्हेशन काऊंसिलिंगचे आयोजन**

दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त साजरा केला जाणाऱ्या राष्ट्रीय नवोन्मेष (इनोव्हेशन) दिनाच्या कार्यक्रमाची सुरूवात उद्योगरत्न श्री. रतन टाटा यांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे माजी

विद्यार्थी, वक्ते, शिक्षणतज्ज्ञ तसेच सावित्रीबाई फुले विद्यापीठातील तंत्रज्ञान विषयाचे डीन डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी राष्ट्रीय हितासाठी वैज्ञानिक वृत्ती जोपासण्याचे महत्त्व सांगितले. सखोल अभ्यास व नाविन्यपूर्ण उत्पादन बनवण्याच्या गोष्टीवर त्यांनी भर दिला. श्री उमेश राठोड , शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेलचे पश्चिम विभागीय समन्वयक, प्रमुख पाहुणे होते. नवोन्मेषक, उपयोजकता, आधुनिक व प्राचीन भारत, नवउद्योजकता तसेच विकासाच्या खोल ज्ञानासाठी त्यांनी एक नवीन दृष्टिकोन प्रदान केला. डॉ. पी. जी. शेटे, IIC चे समन्वयक तसेच डॉ. एम. पी. अत्रे IIC च्या सहसमन्वयक यांनी उपस्थितांचे आभार मानले. या दिवशी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या संशोधनाचे सादरीकरण करण्यात आले. दिवसाची सांगता विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कार्यासाठी बक्षीस वितरणाने झाली. हे बक्षीस वितरण संचालक प्रा. राजेंद्र कडुस्कर आणि प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारंबळे यांच्या हस्ते झाले. विद्यार्थी प्रतिनिधी कु. आर्या गंधे, कु. अथर्व टिकोरे व इतर विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात मोलाचा वाटा उचलला.

### अभिनंदनीय

प्रा. महेश पोतदार यांनी Recent challenges in Engineering & amp Technology या विषयावर व्हर्च्युअल मोडमध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेत पेपर सादर केला. त्यांचा पेपर Multiclass brain tumour Image analysis using deep learning techniques विश्लेषणावर आधारित होता. ही परिषद २६ आणि २७ सप्टेंबर २०२४ रोजी चेन्नई येथे आयोजित करण्यात आली होती.

### कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग

संगणक अभियांत्रिकी विभागातर्फे तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ऑडिट कोर्स ''व्यावसायिक नैतिकता आणि शिष्टाचार'' आयोजित करण्यात आला. सत्र १६ व १७.१०.२०२४ दरम्यान श्री. सौरभ एस. (हॅबिन्सन, व्यक्तिमत्त्व आणि उद्योजकता शाळा) यांनी दिले. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

संगणक अभियांत्रिकी विभागाने द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ऑडिट कोर्स ''पर्यावरण अभ्यास'' आयोजित केला होता. दि. २३ व २४.१०.२०२४ या कालावधीत प्रा. रवींद्र एच. मुळे यांनी व्याख्यान दिले. विद्यार्थ्यांना पर्यावरणविषयक समस्या जाणून घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

विभागाने बीई संगणकाच्या विद्यार्थ्यांसाठी दि. १० ऑक्टोबर २०२४ रोजी प्रकल्प पुनरावलोकन आय आय आयोजित केला होता. विद्यार्थ्यांनी प्रकल्प पुनरावलोकन आयआय दरम्यान त्यांचे अंतिम वर्षाचे प्रकल्प उद्योग तज्ज्ञांना सादर केले आहेत. ज्यामध्ये त्यांच्या प्रकल्पाची आवश्यकता गोळा करणे, संवाद, नियोजन, विश्लेषण आणि डिझाइन समाविष्ट आहे. एकूण ३ उद्योग तज्ज्ञ होते - कु. अपूर्वा इंगळे, कु. भाग्यश्री कांदे, श्री. वेदांत दाते. प्रकल्प पुनरावलोकन आय आय दरम्यान उद्योग तज्ज्ञांनी त्यांच्या मौल्यवान सूचना आणि टिप्पण्या दिल्या आणि विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

### डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी

संगणक विभागाने दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी केली.

### इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग

### अभिनंदनीय

विद्युत विभागातील पीएच. डी. सेंटर मधील प्रा. सौ. कल्याणी कुरूंदकर यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच. डी. डिग्री संपादन केली.

संस्थेच्या वतीने डॉ. सौ. कल्याणी कुरूंदकर यांचे हार्दिक अभिनंदन !

तृतीय वर्ष विद्युत अभियांत्रिकी विभागातील कु. शंतनु यादव, कु. नीरज सोमवंशी, कु. प्रभाकर भोसले आणि कु. अभिषेक घोडके या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या IIC तर्फे आयोजित INVENTECH २४ या स्पर्धेमध्ये हार्डवेअर प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवला. या विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख डॉ. मंगेश ठाकरे यांनी मार्गदर्शन केले.

कु. पियुष बागूल या अंतिम वर्षातील विद्यार्थ्याने विद्यापीठातर्फे आयोजित पुणे सिटी झोनल स्पर्धेमध्ये बॉडी बिल्डिंग या प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवला.

**औद्योगिक भेट - शैक्षणिक सहल**

**PMPML चार्जिंग स्टेशन, पुणे**

तृतीय वर्ष विद्युत अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांची वार्षिक शैक्षणिक सहल, शुक्रवार दि. १८ ऑक्टोबर २०२४ रोजी, PMPML चार्जिंग स्टेशन, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. डॉ. सुनिल गायकवाड, आणि प्रा. सुरेश यमल्ला यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**नांदेड सिटी इलेक्ट्रिकल सबस्टेशन,**

तृतीय वर्ष विद्युत अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांची वार्षिक शैक्षणिक सहल, शुक्रवार दि. १८ ऑक्टोबर २०२४ रोजी, PMPML चार्जिंग स्टेशन, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. डॉ. उज्वला ठकार आणि प्रा. राधा रांजेकर कुरुंदकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**अविहास इलेक्ट्रिकल**

तृतीय वर्ष विद्युत अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांची वार्षिक शैक्षणिक सहल, गुरुवार दि. १७ ऑक्टोबर २०२४ रोजी, अविहास इलेक्ट्रिकल, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती प्रा. उदय सरोदे आणि डॉ. मंदार भवाळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी इंजिनिअरिंग विभाग**

दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालय आणि Department of Information Tech. ACM'S Student Chapter, and Information Technology Student's association (ITSA) यांच्या संयुक्त विद्यमाने सॉफ्टवेअर प्रोजेक्ट मॅनेजमेंट या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. श्री. ऋषभ सिंग, Data enthusiast and Software Developer यांनी सॉफ्टवेअर प्रकल्प व्यवस्थापन मूलभूत तत्त्वे, विविध साधने आणि प्रकल्प डिझाइन आणि मूल्यमापन या विषयी मार्गदर्शन केले.

**आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स विभाग**

**अभिनंदनीय**

❋ अंतिम वर्षातील विद्यार्थी कु. राज कांचन याची Daifuku या जॅपनीज कंपनी मध्ये जॉब साठी निवड झाली आहे. कु. राज कांचन याने रु. ३० लाख वार्षिक वेतन मिळवले आहे.

❋ यंदाच्या आर्ट-सर्कलच्या ग्रुप मधून विविध नाट्यस्पर्धेत भाग घेणाऱ्या कु. शुभ्रा जाधव, द्वितीय वर्षातील विद्यार्थिनीस दाजीकाका गाडगीळ करंडक स्पर्धेत अभिनयाचे उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले. शुभ्राने, युवासेना बाळासाहेब ठाकरे करंडक मध्ये सुद्धा 'Best Actress' हा पुरस्कार मिळवला आहे.

❋ कु. अथर्व कारंजावणे आणि कु. ओंकार कलबुर्गी, द्वितीय वर्ष या विद्यार्थ्यांनी AICTE ॲण्ड MOE Innovation Council तर्फे MGM, संभाजीनगर, येथे आयोजित केलेल्या ५ दिवसीय Bootcamp मध्ये भाग घेतला होता. Innovation , Design & Entrepreneurship या विषयावर आयोजित केलेल्या या कार्यशाळेत त्यांच्या 'Best Idea Pitching' संकल्पनेवर आधारित प्रेझेंटेशनचे विशेष कौतुक झाले.

❋ 'Supra' या Interdisciplinary Competition मध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिपार्टमेंटच्या टीम ने दुसरे पारितोषिक मिळवले. आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स विभागातील कु. क्षितिज याने टीमचा सहाय्यक प्रोग्रामर म्हणून काम पाहिले.

❋ कु. कबीर मर्चंटने २४ HOUR HACKATHON at COEP MindSpark मध्ये "Voice-enabled medicine reminder for senior citizens" या विषयावर अथक काम करून प्रॉब्लेम सोडवून दाखवला, त्याच्या कामाचे खूप कौतुक झाले.

या डिपार्टमेंटच्या हेड, डॉ. मीनाक्षी अत्रे यांना यंदा देखील Nvidia चा प्लॅटिनम बॅज trainer स्टेटस मिळाले आहे. डॉ. मीनाक्षी अत्रे यांना Nvidia या प्रसिद्ध कंपनी तर्फे एक हजार डॉलर बक्षिस देण्यात येईल.

**ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभाग**

सिंहगड उद्योग संघाशी आपल्या महाविद्यालयाची सामंजस्य करार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यासंदर्भात नुकतीच महासंघाच्या वतीने अध्यक्षा पल्लवी जाधव व उपाध्यक्ष श्री. चंपानेरकर यांनी महाविद्यालयाला दि. ८ ऑक्टोबर २०२४ रोजी भेट दिली. यासाठी ४७ कंपन्यांनी सहमती दर्शवली आहे आणि इतर कंपन्या प्रक्रियेत आहेत.

बौर कॉम्प्रेसर, दसॉल्ट सिस्टिम, टोरेंट पॉवर, ईथेना, फानुक, मॉर्गेज कार्ट या कंपन्यांनी आपल्या महाविद्यालयाला कॅम्पस रिक्रुटमेंटसाठी भेट दिली व नऊ ते चार लाख दरम्यान पॅकेजची नोकरी देणार असल्याचे सांगितले.

श्री. अविनाश पोरे, प्रा. पायल तायडे, डॉ. एन.जी जयस्वाल यांनी वरील कार्यक्रमांचे आयोजन केले.

